## "TITLE OF THE PROJECT"

# HISTORY OF CHH. SHIVAJI MAHARAJ'S PERIOD COINS

A Project Submitted to,

## VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

For the Degree of Master of Arts

in

History

By


- Mr.Sunil Gunga Bhosale
- Mr.Ajit Vitthal Salvi
- Mrs.sakshi Lakshman Kadam
- Mrs.Neelam Allabaksh Sheikh
- Mrs.Kaveri Pradeeprao Surve
- Mrs.Neha Shivaji Koundade


Under the Guidance of


Dr. S. R. Kattimani

Head Dept. of History, Vivekanand College, Kolhapur


2022-2023

Scanned with CamScanner

"TITLE OF THE PROJECT"

# HISTORY OF CHH. SHIVAJI MAHARAJ'S PERIOD COINS

A Project Submitted to,

## VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**For the Degree of Master of Arts**

in

**History**

**By**


- Mr.Sunil Gunga Bhosale
- Mr.Ajit Vitthal Salvi
- Mrs.sakshi Lakshman Kadam
- Mrs.Neelam Allabaksh Sheikh
- Mrs. Kaveri Pradeeprao Surve
- Mrs.Neha Shivaji Koundade


**Under the Guidance of**


**Dr. S. R. Kattimani**

Head Dept. of History, Vivekanand College, Kolhapur


**2022-2023**


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

मी अजित विठ्ठल साळवी ,सुनील गुंगा भोसले,साक्षी लक्ष्मण कदम, निलम आल्लबक्ष शेख,कावेरी प्रदीपराव सुर्वे,नेहा शिवाजी कौंदाडे ,विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे **M.A भाग I** च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र **II** च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प शिवकालीन नाण्यांचा इतिहास हा मी स्वत: क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे.पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही .

- विद्यार्थ्यांचे नाव: अजित विठ्ठल साळवी — विद्यार्थ्यांचे सही:
- विद्यार्थ्यांचे नाव: सुनील गुंगा भोसले — विद्यार्थ्यांचे सही:
- विद्यार्थ्यांचे नाव: साक्षी लक्षण कदम. — विद्यार्थ्यांचे सही:
- विद्यार्थ्यांचे नाव: निलम अल्लबक्ष शेख — विद्यार्थ्यांचे सही:
- विद्यार्थ्यांचे नाव: कावेरी प्रदीपराव सुर्वे — विद्यार्थ्यांचे सही:
- विद्यार्थ्यांचे नाव: नेहा शिवाजी कौंदाडे — विद्यार्थ्यांचे सही:

दिनांक: १६/०६/२०२३

ठिकाण: कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे **M.A भाग I** च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी अजित विठ्ठल साळवी सत्र **II** च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प **शिवकालीन नाण्यांचा इतिहास** हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून , आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:**१७/६/ २०२३

**ठिकाण:** कोल्हापूर

17/6/23

डॉ. एस . आर. कट्टीमनी

**विभाग प्रमुख,**
**इतिहास विभाग,**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

# प्रास्तावना

## शिवकालीन नाण्यांचा इतिहास

शिवराई हे शिवाजीमहाराजांनी राज्याभिषेकाच्यावेळी पाडलेले तांब्याचे नाणे आहे. सन १९२०[ संदर्भ हवा ] पर्यंत हे नाणे चलनात होते. ब्रिटिश राजवटीत नवीन नाणी आल्यानंतर ते हळूहळू बंद झाले. ब्रिटिशांनी सर्व शिवराया गोळा करायचा प्रयत्न केला, पण अजूनही काही शिवराया नदीतील वाळूत किंवा जमिनीत सापडतात.

महाराज शिवाजी राजे भोसले यांनी "ज्येष्ठ शुद्ध १२, शुक्रवार घटी २१, पळे ३४, विष्कंभ ३८, घटिका ४०,पळे सिं ४२ तीन घटिका रात्र उरली" असताना म्हणजेच ६ जून १६७४ रोजी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. छत्रपती अशी पदवी धारण करून स्वतंत्र आणि सार्वभौम राजाचं प्रतीक म्हणून स्वतःचे चलन सुरू केले. उपलब्ध साधने आणि पुराव्यानुसार सोने व तांबे या दोन धातूंची नाणी शिवाजी महाराजांनी पाडलेली आढळतात. जेम्स ग्रँड डफ यांनी आपल्या हिस्ट्री ऑफ द मराठाज् या पुस्तकात शिवाजीने इसवी सन १६६४ मध्ये नाणी पाडली असे नमूद केले आहे. परंतु ही नाणी राज्याभिषेकानंतर म्हणजे १६७४ला पाडली गेली असल्याचे अनेक इतिहास अभ्यासकांनी सिद्ध केलेले आहे.

हे तांब्याचे नाणे साधारण ११-१३ ग्रॅम वजनाचे असते. व्यास २ सॅ.मी. असतो. एका बाजूस श्री/राजा /शिव तर दुसऱ्या बाजूस छत्र /पती असे लिहिलेले असते. यास पूर्ण शिवराई असेही संबोधिले जाते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# प्रकरण १ ले

पैशाच्या स्वरूपावर विचार करताना असे ध्यानात येते की 'पैशाने' लोकांना जितके वेडे केले असेल तितके 'प्रेम' या भावनेनेही केले नसेल.

## प्रास्ताविक :

भारतात गेल्या २५०० वर्षात अशी एकही प्रौढ व्यक्ती झाली नाही की जिने चलनाचा कधीच वापर केला नाही. सध्या आपण नाणी, नोटा, क्रेडिट, डेबिट कार्ड इ. चा वापर आर्थिक व्यवहारात करतो. सध्याच्या युगात या गोष्टी मुबलक प्रमाणात आपल्याकडे असतील तरच आपले जीवन सोपे होईल अन्यथा नाही, पण अश्मयुगात आदिमानवाच्या काळात चलन नव्हते, त्याची गरजच नव्हती. चलन जरी नसले तरी काही प्रमाणात वस्तुविनिमय जरूर होता. तसे पाहता देवघेवीची कृती आजही तीच आहे. त्याचे माध्यम फक्त बदलले आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

साधारणतः नवाश्मयुगाच्या काळात माणूस स्थिर शेती करू लागला. तेव्हापासून पशुंना खरेदी-विक्रीतील माध्यम मानले गेले. होमर या कवीने ग्रीक महाकाव्य 'इलियड' मध्ये गाईंचा स्वरूपात वस्तूच्या किंमती दिल्या आहेत. पारशी ग्रंथ 'झेंद अवेस्ता' यातही डॉक्टरची फी गाईच्या रूपात दिली आहे. भारतातही वैदिक कालखंडात 'गाय' हे विनिमय माध्यम दिसते. गाईप्रमाणे धान्य, मासे, नारळ, तंबाखू, (चीनमध्ये) कपडे विनिमयाचे माध्यम म्हणून वापरले गेलेले दिसतात.

वस्तुविनिमयपद्धतीत विकास होत होत दागिने, धातूची कडी, धातूच्या अंगठ्या, गोळे इत्यादी वापरले जाऊ लागले. भारतीय संदर्भात हडाप्पाच्या उत्खननात विशिष्ट वजनाचे धातूचे तुकडे मिळाले आहेत पण रूढ अर्थाने ती नाणी होत नाहीत.. ऋग्वेदात इंद्रमूर्तीची किंमत गाईंच्या स्वरूपात व्यक्त केली आहे. किंमत ही गोपुच्छांच्या स्वरूपात (गाईची शेपटी) व्यक्त करत ही प्रथा काही ठिकाणी आजही शिल्लक आहे. वैदिक काळात हिरण्यपिंड (सोन्याचे गोळे) यांचाही

VIVEKANAND COLLEGE KO
ESTD
JUNE
196
(Auton

Scanned with CamScanner

उल्लेख आढळतो. तसाच दागिन्यांचाही उल्लेख आहे. उपनिषदात शतमानांचा उल्लेख आहे.

एक गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेवायला हवी की १) वस्तुविनिमय, २) विशिष्ट वस्तूद्वारेच विनिमय उदा. गाय, दागिने इ. ३) विशिष्ट धातूच्या तुकड्याद्वारे विनिमय ४) नाणी अशा उत्क्रांतीच्या अवस्था दिसतात. यांतील वस्तुविनिमय अवस्थेत जर घेणारा व देणारा यांच्या गरजा एकसारख्या असतील तरच व्यवहार होतो अन्यथा नाही. (उदा. मला पेन हवे आहे, समोरच्याकडे पेन आहे पण त्याला पेन्सिल हवी आहे आणि ती माझ्याकडे नाही). याला आपण दुहेरी गरजांचा योगायोग म्हणू.

वरील टप्प्यातील समस्यांवर मात करण्यासाठी विशिष्ट वस्तूद्वारे विनिमय दिसतो. उदा. धान्य, गाय, पण यातही समस्या होतीच. एका किलो धान्याचे मूल्य एक गाय असेल तर १/२ किलो धान्यासाठी अर्धी गाय देणे घेणे शक्य नव्हते. त्यात गाय, धान्य नाशवंत असल्याने टिकाऊ धातूंचा वापर सुरू झाला. कालांतराने

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

विशिष्ट आकाराच्या वजनाच्या धातूच्या तुकड्यांवर त्यातील वजन, शुद्धता, मूल्य यांची खात्री देणारी चिह्ने उमटवली गेली त्याला 'नाणी' म्हणतात.

रूढ मतानुसार आशिया मायनर (तुर्कस्थानातील ॲनातोलिया नामक प्रदेश) येथील 'लिडिया' या ठिकाणी जगातील आदिम नाणी पाडली गेली. व्यापाऱ्यांची चिन्हे उमटवलेली ही नाणी इलेक्ट्रम (चांदी+सोने) या धातूची आहेत. यांचा काळ इ. स. पूर्व ७ वे शतक मानला जातो.

'भारतीय संदर्भात, 'नाण्यांचा' जन्म हा इ.स.पूर्व ६ व्या शतकात मानला गेला आहे. डॉ. परमेश्वरीलाल गुप्त यांचे मते 'आहत' (Punchmarked Coins) ही सर्वात जुनी भारतीय नाणी वरील कालखंडातील होत. भगवान बुद्ध (इ.स.पू. ५६३-४८३) व भगवान महावीर (इ.स.पू. ५९९-५२७) यांच्या काळापासून 'दुसऱ्या 'नागरीकरणाची' प्रक्रिया घडून आली ज्यात लोह तंत्रज्ञानाचा शेती व लढाई क्षेत्रात वापर, मोठ्या नगरांचा उदय, व्यापार कारागिरी विकास, नाण्यांचा जन्म या प्रक्रिया घडून आल्या.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

डॉ. दिलीप राजगोर यांनी नव्याने बुद्धोत्तर काळातील महाजनपदांची आहतनाणी यांच्या वर्गीकरणाचा प्रयत्न केला आहे.जवळपास २५०० वर्षांचा इतिहास असणाऱ्या नाण्यांनी, इतिहासात विशेषतः आर्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. मूल्यमापन, मूल्यसंचय इत्यादी महत्त्वाच्या आर्थिक कृती नाण्यांमुळे सोप्या झाल्या.

भारतीय इतिहासाच्या प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडांतील नाण्यांचा इतिहास हा रंजक आहे. प्राचीन कालखंडाप्रमाणे मध्ययुगीन नाण्यांचा कालप्रवासही महत्त्वाचा आहे. मध्ययुगीन नाण्यांवर प्रामुख्याने लिपी व मजकूरच दिसतो, चिन्हे दिसत नाहीत. महाराष्ट्रात यादव (सु. ८६० ते १३१८), विजयनगर, बहामनी (१३५८ ते १५२६), शाही (१४८४ ते १६८७) व फारुखी (१३७० ते १५९९) नि मराठी राजघराण्यांची नाणी व त्यांची चलनपद्धती दिसते.

भारतीय इतिहासातील अतिशय महत्त्वाच्या परिवर्तनांपैकी एक म्हणजे ब्रिटिशांचे आगमन आणि भारताचा मध्ययुगीन अवस्थेतून आधुनिक काळात प्रवेश. या टप्प्यावर भारतात चलनाचे कायदे, सुवर्ण-रौप्यमान पद्धती, चलन- विषयक

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

समिती, २० व्या शतकात रिझर्व्ह बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीशी संबंध अशा आधुनिक घटना दिसू लागतात. अशा स्वरूपातील घटना याच मुळी आधुनिकता व्यक्त करणाऱ्या होत.

त्या दृष्टीने महाराष्ट्र (विशेषतः प. महाराष्ट्राच्या संदर्भातील) आधुनिक- पूर्व ते आधुनिक चलन, त्यातील नाणी, आर्थिक इतिहास यांचा सध्याच्या चलनाचे 'पूर्वज' म्हणून विचार या पुढे मांडलेला आहे. नाणी व आर्थिक इतिहास यांना केंद्रस्थानी ठेवून इतिहासाचा अभ्यास हा नवीन माहिती व ज्ञान देणारा ठरतो यात शंका नाही. परंतु तसा प्रयत्न करण्यापूर्वी इतिहासाचा एक शिल्लक राहिलेला अवशेष, साक्षीदार म्हणूनही नाण्यांचा विचार गरजेचा ठरतो.

सध्याच्या आधुनिक कालखंडात इतिहासाच्या व्याख्या, संशोधनपद्धती, स्वरूप, आणि 'इतिहासाची विविध विश्वे' इत्यादींबाबत अभूतपूर्व असा विचार सुरू झाला आहे. इतिहास हा अन्वयार्थात्मक असल्याने इतिहासाच्या बदलत्या व्याख्यांनी व विस्तारणाऱ्या स्वरूपाने इतिहाससाधनांच्या विश्वसनीयतेच्या क्रमातही बदल घडवून आणला आहे. स्थल, काल, व्यक्ती, समाज या अनुबंधाच्या चौकटीत

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

इतिहास - साधनांच्या शास्त्रीय पद्धतीच्या परीक्षण व उपयोगाने, परंतु इतिहासलेखकाच्या कल्पनेच्या मदतीने, गतकाळाचा अन्वयार्थ मांडणारी मानवाची, मानवाच्या संदर्भातील बहुआयामी कथा म्हणजे इतिहास. डॉ. राजा दीक्षित यांनी म्हटल्याप्रमाणे, "इतिहास हा मूलतः अन्वयार्थ असतो. हा अन्वयार्थ कालमानाप्रमाणे बदलत जातो, कारण तात्विक अर्थाने सर्व इतिहास 'समकालीन' असतो. स्वाभाविकपणे इतिहासाचे नवनवीन पद्धतींनी विश्लेषण करणे ही ऐतिहासिक संशोधनातील एक अपरिहार्य आवश्यकता असते".

तत्कालीन इतिहाससंकल्पनेच्या प्रभावातून तसेच प्रशासकीय गरजांमधून ब्रिटिशकाळात, विशेषतः १९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २०व्या शतकाच्या पूर्वार्धात, ऐतिहासिक कागदपत्रांची जमवाजमव करण्यात आली, परंतु त्याच्या कितीतरी आधी शिलालेख, ताम्रपट, नाणी यांचा रोमांचक संग्रह व अभ्यास सुरू झाला होता. आधुनिक काळाच्या चष्म्यातून या कालखंडाकडे पाहिले असता कागदपत्र अभिलेखादी, नाण्यांसारखी भौतिक साधने इत्यादींचा वापर प्रामुख्याने 'राजकीय' इतिहासासाठी केला गेला. त्यामुळे उत्तर आधुनिक काळात विशेषत्वाने प्रसिद्धी व

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

मान्यता पावलेल्या सामाजिक वंचितांच्या वा अधःस्तरीयांच्या स्त्रियांच्या इतिहासासाठी ही साधने दुय्यम महत्त्वाची वाटू लागली. इतिहाससाधनांचा योग्य तर्काच्या साहाय्याने उपयोग केल्यास ती विविधांगांनी उपयोगी ठरू शकतात. अशा दृष्टिकोनातून फ्रँक पर्लिन यांसारख्या अभ्यासकांनी पुराभिलेखीय सामग्री व प्रत्यक्ष नाण्यांच्या साहाय्याने ब्रिटिशपूर्व आर्थिक इतिहासावर प्रकाश टाकला आहे. तात्पर्याने असे म्हणता येईल की, स्थलकालाच्या मर्यादांसह इतिहासाची साधने ही 'साधने" असतात. त्यांचा विविध पद्धतींनी अन्वयार्थ लावून त्यांचे नवनवीन पद्धतींनी विश्लेषण आवश्यक ठरते.

## नाण्यांचा अभ्यास करायचाय ?

जुन्या नाण्यांचा संग्रह व अभ्यास हा छंद जिवाला पिसे' लावणारा छंद आहे, पण बऱ्याचदा शालेय जीवनातील हे वेड, कॉलेजला जाण्याच्या आतच विरते. या

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

छंदाला थोडीफार शास्त्रीय माहितीची जोड दिल्यास तो आयुष्यभरासाठी एक आनंदाचा स्रोत बनतो.

नाशिकच्या साधारणत: पश्चिमेस नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावर निम्म्या अंतरावर 'भारतीय नाणे शोध संस्था' (Indian Institute of Research in Numismatic Studies) अंजनेरी या गावाजवळ आहे. सामान्य प्रेक्षकापासून ते मुरलेल्या संशोधकांपर्यंतच्या नाणेप्रेमींची ही जगप्रसिद्ध संस्था जणू 'पंढरी' आहे.! सुसज्ज ग्रंथालय, तज्ज्ञ सुस्वभावी प्राध्यापक, हजारो छायाचित्रे, नाणेविषयक प्रकाशने, उत्तम विश्रामगृह, नाणी-लिपी परिचय वर्ग, नियतकालिके, आंतर्राष्ट्रीय कार्यशाळा ही या संस्थेची वैशिष्ट्ये होत. पत्ता : Indian Institute of Research in Numismatic Studies, (P. O. Anjaneri, Nasik.)

इतिहासाच्या इतर साधनांप्रमाणे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे नाणी होत. विशिष्ट आकार, वजन, जाडी व शुद्धतेचा; वजन व शुद्धतेची हमी देणारी चिन्हे, लिपी व मजकूर यांनी अंकित, खासगी वा शासकीय सत्तेद्वारा विनिमयाचे माध्यम ठरवलेला असा धातूचा तुकडा म्हणजे 'नाणे' होय. |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

'पैसा' (Money) याचे प्रमुख रूप म्हणून भारतीय इतिहासाच्या सर्व कालखंडात नाण्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय इतिहासात इ.स.पू. सहाव्या शतकापासून नाण्यांची परंपरा निर्विवादपणे दाखवता येते. भारताच्या विशेषतः प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडातील राजकीय, काही प्रमाणात धार्मिक आणि आर्थिक इतिहासाच्या संशोधनात व लेखनात नाण्यांचा 'अस्सल' पुरावा म्हणून उपयोग झाला आहे.

## इतिहासलेखन आणि नाणी :

इतिहासाच्या लेखनात नाणी ही महत्त्वपूर्ण साहाय्यकारी अस्सल पुरावे ठरतात. जी मर्यादा इतर पुराव्यांना आहे तीच नाण्यांनाही आहे. ती म्हणजे नाणी स्वयंसिद्ध (Axiomatic) नसतात. परंतु ग्रंथरूप पुराव्याबाबत काळाची अचूकता संदिग्ध ठरते तसे (नाण्यांबाबत) विशेषतः (कालोल्लेखायुक्त) काळाचा स्पष्ट उल्लेख असल्याने नाण्यांबाबत होत नाही. उलट पुरातत्त्वीय उत्खननांत विशिष्ट 'स्तरातील'

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

(Stratum) संस्कृतीचे कालनिर्देशनाचे काम नाणी उत्तम प्रकारे करतात. नाणी एक 'अवशिष्ट ऐतिहासिक वास्तव' होत. विशेषतः आर्थिक इतिहासाची ती अविभाज्य घटक असतात. त्यामुळे आर्थिक इतिहासाच्या इतर साधनांसह नाण्यांचा वापर महत्त्वाचा होय. मुळात नाण्याचे अस्तित्व क्रययोग्य वस्तू वा सेवेचे संभावित अस्तित्व प्रदर्शित करते. त्यामुळे राजनामे इत्यादींच्या संशोधनासाठी केवळ नाण्यांचा उपयोग करून त्यांची उपयोजितता मर्यादित न करता त्यांचा विविध अंगांनी उपयोग करून घेता येईल. भारतीय इतिहास- लेखनाच्या संदर्भात भारतीय नाण्यांची काही वैशिष्ट्ये नोंदवता येतील.

i) नाणी खूप मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत व अद्यापि उपलब्ध होत आहेत.

ii) साधारणतः २,६०० वर्षांची अखंडित परंपरा भारतीय नाण्यांना लाभलेली आहे.

iii) या नाण्यांची 'प्रांतिक' व 'सार्वत्रिक' वैशिष्ट्ये आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

iv) भारतीय चलनातील सातत्य - बदलांचा आणि इतिहासातील इतर घडामोडींचा कार्यकारणसंदर्भ नाण्यांमुळे शोधता येतो.

आधुनिक काळाकडे येताना इतिहाससाधनांची विशेषतः कागदपत्रादी लिखित साधनांची मोठी उपलब्धता असल्याने नाण्यांची उपयोजितता कमी ठरते असा समज आहे. परंतु-

i) अर्थव्यवस्थेतील विनिमयात्मक गरजा भागवणाऱ्या चलनाचा एकक, भागमूल्यांक आणि

ii) विशिष्ट कालखंडाच्या खुणा वाहणारे साधन म्हणून नाण्यांचे महत्त्व कमी होत नाही. इतिहासातील परिवर्तने, बदल यांच्या साक्षी ही नाणी देतात. त्यामुळे आधुनिक इतिहाससंदर्भातसुद्धा नाण्यांची मर्यादित, पण निश्चित उपयुक्तता आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# समस्या आणि भूमिका :

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी म्हटले आहे की, "आधुनिक महाराष्ट्र-समाजाची घडण, महाराष्ट्रीयांची प्रचलित मनोभूमिका व आमच्या आजच्या समस्या या कशाचाही विचार करावयाचा तर त्याचे मूळ हुडकण्यास निदान अठराव्या शतकापर्यंत तरी जाणे आवश्यक आहे.

वरील विधानाच्या प्रकाशात वसाहतपूर्व कालखंडातील आणि वासाहतिक कालखंडाच्या सुरुवातीच्या बदलांचा, नाण्यांच्या आणि चलनपद्धतीच्या विशेष संदर्भातील मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. यातून,

i. १९व्या शतकाच्या पूर्वार्धातील नाणी व चलनव्यवस्थेच्या इतिहासाची; आणि

ii. या परिवर्तनाच्या कालखंडातील अप्रकाशित पैलूंची चर्चा अपेक्षित आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

प्रख्यात आर्थिक इतिहासतज्ज्ञ फ्रँक पर्लिन यांनी १८व्या शतकातील पश्चिम दख्खनमधील ग्रामीण समाजांबाबत प्रमुख समस्या मांडली आहे. वसाहतवादी सतेच्या आगमनापूर्वी येथील आर्थिकदृष्ट्या मागास व्यवस्थेचे किती प्रमाणात मौद्रिकीकरण झाले होते?

पर्लिन यांचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे. वास्तविक पाहता पूर्वी आधुनिकपूर्व कालखंडास 'अंधकारमय कालखंड' (Dark Age) असे म्हटले गेले. आता मात्र या .कालखंडाचा विविधांगांनी पुनर्विचार सुरु झाला आहे. १८व्या शतकातील भारताचा पुनर्विचार करताना सीमा अल्वी यांनी दोन गुंतागुंतीच्या परिवर्तनांचा उल्लेख केला आहे.

i) आर्थिक पेचप्रसंग आणि सत्ताधारी वर्गाकडून शोषण याचा परिणाम म्हणून झालेला -हास.

ii) प्रादेशिक राज्यांच्या विकासामुळे निर्माण झालेली (केन्द्रातील) राजकीय उलथापालथ. ७

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

जदुनाथ सरकार यांच्यापासून इरफान हबीब यांचेपर्यंत विद्वानांनी १८व्या शतकाचे स्वरूप, मुघल साम्राज्याचा -हास, प्रादेशिक सत्तांचा उत्कर्ष याबाबत विविधांगी कारणमीमांसा केली आहे. यातील बहुतेक विद्वानांनी आर्थिक पद्धतीची कारणमीमांसा केलेली आहे. उदा. इरफान हबीब यांचे मते, जमीन- महसुलाचा (भूमहसूलाचा) जादा दर, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणातील शोषण, शेतकऱ्यांची स्थलांतरे आणि उठाव हे मुघल साम्राज्याच्या -हासाला कारणीभूत ठरते.' यासंदर्भात प्रादेशिक सत्तांचा उत्कर्ष हा अतिशय महत्त्वाचा घटक मानला आहे. या सर्व अभ्यासाचा विचार करता १७ ते १९व्या शतकांच्या अर्थव्यवस्थेचा | समग्रलक्षी (Macro) आणि सूक्ष्मलक्षी (Micro) अभ्यास आवश्यक ठरतो. अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून, अर्थव्यवस्थेची नाडी मानल्या गेलेल्या चलनाचा अभ्यास हा एकंदर अध्ययनास पूरक ठरू शकतो.

या तात्त्विक भूमिकेतून १७व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या अनुक्रमे शिवकाल, पेशवेकाल व ब्रिटिश काळातील

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

चलनाचा; तसेच तत्संबंधी अनेक पैलूंचा चिकित्सक विचार या ठिकाणी मांडला आहे.

सदर अध्ययन करताना नाण्यांच्या केवळ तपशिलात्मक वर्णनात न अडकता प्रसंगी त्यांचाही वापर करून इतिहासासाठी त्यांची उपयोजितता मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नाणप्रकार, त्यांचा परस्पर विनिमयसंबंध, नाण्यांबाबत कूटस्थळांची चर्चा, नवीन शोध यांचा संदर्भ घेऊन प्रकाशित, अप्रकाशित पुराभिलेखीय सामग्रीच्या व इतर साधनांच्या साहाय्याने तीन प्रातिनिधिक शतकांच्या चलनप्रकृतीचा हा चिकित्सक अभ्यास आहे.

## विषयाची स्थलकालमर्यादा :

महाराष्ट्रातील चलनाचा इतिहास या पुस्तकात प्रामुख्याने चलनविषयक चिकित्सा केली असल्याने, स्थलकालमर्यादा काटेकोर पद्धतीने व्यक्त करणे कठीण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

आहे. सर्वसाधारपणे सध्याच्या महाराष्ट्र राज्याच्या सीमांचा संदर्भ जरी वरील महाराष्ट्रातील चलन या संदर्भात असला तरी यात अभिप्रेत परिसर हा सध्याच्या राजकीय महाराष्ट्राच्या बाहेरीलसुद्धा आहे. उदा. खानदेशाचा विचार करताना, सध्याच्या गुजरातचा काही भागही चलनदृष्ट्या या परिसराशी सलगता दाखवतो. त्यामुळे त्याचा अंतर्भाव आवश्यक ठरतो. सदर पुस्तकात जरी खानदेश, सोलापूर यांचे संदर्भ असले तरी हे अध्ययन विशेषत्वाने पश्चिम महाराष्ट्राशी जास्त संबंधित आहे.

कालमर्यादेचा विचार करता महाराष्ट्रातील मराठी राज्याचे चलन है। निर्विवादपणे १६७४ पासून दाखवता येते. म्हणून शिवकालीन चलनाच्या संदर्भात १६७४ ते १७०७ असा कालखंड मानला आहे. पेशवेकालीन चलनाबाबत, सर्वसाधारणपणे पेशवेकालखंड १७०७ ते १८१८ याचा मुख्य आधार घेतला आहे. ब्रिटिश कालखंडाबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे कारण राजकीयदृष्ट्या ब्रिटिश कालखंडाचा विचार करता १८५७ हा जरी परिवर्तनाचा बिंदू असला तरी नाणकशास्त्रीय दृष्टिकोनातून १८४० हे वर्ष जास्त महत्त्वाचे ठरते. चौथा विल्यम

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

याची नाणी आपणास १८४० पर्यंत दिसतात. त्यानंतर व्हिक्टोरिया राणीची नाणी चलनात आलेली दिसतात. १८४० पाशी थांबण्याचे दुसरे कारण म्हणजे नवीन राज्य स्थापन करताना ब्रिटिशांनी जी चलनविषयक धोरणे राबविली, त्यांचा अप्रकाशित कागदपत्रांच्या साहाय्याने मांडलेला अभ्यास येथे अभिप्रेत आहे. तसे पाहता अध्ययनाच्या स्थलकालाचा विचार करता चलन ही एक सातत्यपूर्ण गोष्ट आहे तरीही वरील स्वरूपाची कालमर्यादा ही अध्ययनाच्या सोयीसाठी मानली आहे.

## संदर्भ आणि टिपा

१) श्रीधर (राजा) मधुकर दीक्षित, १९ व्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय' पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी (इतिहास) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, (अप्रकाशित), पुणे, मार्च १९९८, पृ. 'एक'.

२) उदा. जेम्स मिलचा हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया हा ग्रंथ इंग्लंडमधील हेलेबरी कॉलेज मध्ये क्रमिक इतिहास म्हणून शिकवला जात होता, ब्रिटिश

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964
Scanned with CamScanner

अधिकाऱ्यांना भारतात नोकरीवर पाठवण्यापूर्वी याच कॉलेजात शिक्षण दिले जात असे. परिणामी ब्रिटिश प्रशासकांच्या भारतावरील ऐतिहासिक लेखनावर मिलूच्या मतांचा बराच प्रभाव दिसतो. पहा : प्रा. डी. एन्. झा, एन्शंट इंडिया : इन हिस्टॉरिकल आउटलाइन, अनु. मा. कृ. पारधी, पुणे, २००२, पृ.१४.

3) P.L. Gupta. T.R. Hardaker, Ancient Indian Silver Punchmarked Coins of the Magadha MauryaKarshāpana Series, Anjaneri-Nashik, 1985, pp.. 1-2.

अधिक तपशिलांसाठी पहा:

i. P.P. Prabhune, Coins as a Source of History: Some Problems and

ii. Perspectives, Unpulibshed paper presented in the seminar,

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

iii. Department of History, University of Pune, 3rd March 1998.
धनंजयराव गाडगीळ, पुणे शहरातील महाजन व नगरशेठ, पुणे, १९६२, पृ. ६ वर उद्धृत.

iv. Frank Perlin, 'Money-use in Late Pre-Colonial India and the International Trade in Currency Media', in J.F. Richards (ed.), Imperial Monetary System of Mughal India, New Delhi, 1987, Pp. 235-36.

v. Seema Alavi (ed.), The Eighteenth Century in India, New Delhi, 2002, p.01.

vi. Ibid., p.04.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

प्रकरण २ रे

# मराठाकालीन चलन

(इ.स.१६७४ ते १८१८)

शिवकाळाचा नाणकशास्त्रीय अभ्यास (१६७४- १७०७)

## प्रास्ताविक :

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासातील, ब्रिटिश-पूर्व कालखंडाचा विचार करता एक महत्त्वाचा कालखंड म्हणजे मराठा कालखंड (१६३०-१८१८) हा होय. अध्ययनाच्या सोयीसाठी मानलेल्या या कालखंडाचे दोन उपविभाग पडतात. त्यांतील पहिला विभाग म्हणजे शिवकाळ हा इ.स. १६३०-१७०७ असा मानला जातो, तर दुसरा विभाग म्हणजे पेशवेकाळ, हा इ.स. १७०७-१८१८ असा मानला जातो. हे कालखंड जरी अध्ययनसोयीसाठी पाडलेले असले तरी ते महत्त्वपूर्ण परिवर्तनांवर आधारित आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

अभ्यासकांनी वरील कालखंड हे महत्वपूर्ण परिवर्तनांवर (उदा. १६३० शिवाजीमहाराजांचा जन्म) आधारित परंतु सर्वसमावेशक पद्धतीने निश्चित केले आहेत. मात्र या कालखंडांच्या आर्थिक इ. प्रकारासारख्या पैलूंबाबत काही निराळ्या स्वरूपाचे उप-कालखंड पाडणे शक्य आहे व तसे अभ्यासकांनी पाडलेलेही आहेत. उदा. महाराष्ट्राच्या चलनाचा अभ्यास करताना हा कालखंड १६७४ ते १८१८ असा मानला जातो. कारण, १६७४ पासून निर्विवादपणे मराठाराज्यप्रणीत नाणी ही पाडलेली दिसतात. ब्रिटिशपूर्व मध्ययुगीन महाराष्ट्रीय चलनाचा अभ्यास हा मराठा कालखंडाशिवाय अपुरा ठरतो. पश्चिम महाराष्ट्रात, स्थापन झालेल्या मराठा राज्याच्या काही चलनपरंपरेचे सातत्य हे आपणास अगदी ब्रिटिशकाळाच्या सुरुवातीपर्यंत दिसून येते. त्यामुळे चलनाच्या दृष्टीने शिवकाल (१६७४ - १७०७) व पेशवेकाल (१७०७-१८१८) यांच्या अध्ययनास महाराष्ट्र प्रांताच्या चलनाच्या इतिहासात 'मराठा नाणकशास्त्र' (Maratha Numismatics) म्हणून ओळखले जाते. मराठा नाणकशास्त्राच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश कालखंडाच्या चलनेतिहासाचा अभ्य संदर्भयुक्त ठरतो. कारण १७व्या-१८व्या शतकातील नाणी व चलनव्यवस्थेचा मोठा प्रभाव १९व्या शतकातील नाणी व चलनव्यवस्थेवर आढळून येतो. त्यामुळे मराठा नाणकशास्त्रातील नाणी, चलनव्यवस्था, नाण्यांची उत्पादनपद्धती व त्यांचे गुणावगुण यांचा विचार आवश्यक आहे.

शिवकाळातील चलनाचा कागदपत्रांच्या विशेष संदर्भात पुरेसा अभ्यास झालेला नाही. प्रत्यक्ष 'नाणी' आणि 'कागदपत्रे' यांचा स्वतंत्र विचार अनुक्रमे नाणीसंग्राहक आणि

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

इतिहासअभ्यासक यांच्या पातळीवर झाला आहे. या दोहोंचा संगम ही अभ्यासातील पोकळी (Lacuna) आहे'. शिवकालीन नाणेप्रकारांचा आढावा घेता, सोन्याचा होन, चांदीची लारी व तांब्याची शिवराई हे प्रमुख नाणेप्रकार आढळतात. या नाणेप्रकारांचा विचार करता, न्या. महादेव गोविंद रानडेंपासून अनेक अभ्यासकांनी 'होन' या सुवर्णनाण्यांच्या १७व्या शतकाच्या चलनातील महत्त्वाबाबत लिहिले आहे. यासंदर्भात फ्रँक पर्लिन यांनी सचित्र संशोधन मांडले आहे'.

## होनाचा प्रश्न :


भारतीय इतिहासात चालुक्यकाळापासून (सु. ५०० ते ११८९) ते शिवकाळापर्यंत होन या भागमूल्यांकाच्या (परिमाणाच्या) सुवर्णनाण्यांचा चलनात उपयोग होत होता. 'शिवराई होन' या नाणक उल्लेखाने काही संशोधकांना संभ्रमात टाकले होते. कारण,

१) राज्याभिषेकप्रसंगी (१६७४) 'शिवराई' होन शिवाजी महाराजांनी पाडला; पण,

२) 'सभासद बखर' तसेच शिवपूर्वकालीन 'वकाई' ग्रंथातही शिवराई होनाचा उल्लेख आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner



विजयनगर साम्राज्याचा सुवर्णहोन (वजन ३.४ ग्रॅम्स)

(वरील शिवपूर्वकालीन ग्रंथात वर्णन केलेला 'शिवराई होन' हा विजयनगर साम्राज्यातील सदाशिवराय (इ.स. १५४२-१५७६) याचा होय. हे लक्षात घेता शिवराई होनांमध्ये गल्लत होण्याची शक्यता नाहीशी होते.

शिवाजी महाराजांनी पाडलेले होन : पुढील बाजूवर 'श्री / राजा / शिव', मागील बाजूवर 'छत्री/पति' अशा लेखाचे सुवर्णहोन (वजन २.७२ ग्रॅम्स) उपलब्ध आहेत. मात्र शासकीय आणि खाजगी संग्रहात मिळून १०चे वर असे होन दाखवता येत नाहीत. त्यामुळे अशा शिवराई होनांची संख्या किती? इतक्या अल्प प्रमाणात ते उपलब्ध असल्यास त्यांना शिवकालीन चलनात प्रमुख

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

नाणे मानायचे का? असे प्रश्न उपस्थित होतात. याबाबत काही प्रातिनिधिक मतांचा विचार करू ...

१) प्रा. ग. ह. खरे यांनी काहीशा उत्तरकालीन कागदपत्रांच्या साहाय्याने शिवाजीमहाराजांनी पाडलेले 'शिवराई होन' बऱ्याच संख्येने चलनात असावेत असे मत मांडले आहे'.

२) सभासद बखरीतील नाण्यांची यादी पाहता ते सर्व विजयनगरीय होन होत. ३) शिवकाळात दर्शनी मूल्याचे चलन नव्हते तर अंतर्गत मूल्याचे होते. त्यामुळे होन या भागमूल्यांची कोणत्याही राजा / राजवंशाची नाणी (नाणी + मूल्यसंचय म्हणून) वापरात होती.

या विवेचनाच्या प्रकाशात सभासद बखरीत वर्णन केलेल्या नाणकनामांचा विचार करता शिवकालीन चलनातील संमिश्रतेचा अंदाज येतो. विजयनगरीय होनांपासून ते 'पुतळी पर्यंत सर्वांचा समावेश तत्कालीन चलनात होता. ही नाणी मूल्यसंग्रह म्हणून पेशवेकाळातही होती, पण १९व्या शतकात रौप्यमान पद्धतीत (Silver Standard) यांचे नाणे म्हणून अस्तित्व राहिले नाही.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

# होनाची चलनपद्धती व भागमूल्यांक

राजव्यवहारकोशात होनाचे भागमूल्यांक आणि चलनपद्धती पुढील शब्दांत दिलेली आहे :

द्रव्यं तु नख्त संज्ञं स्यात् वराहो होन उच्यते ।।३८।।

तदर्थं तु प्रतापः स्याद् भाषयोरुभयोरपि ।।

वराहपादो धरणश्चवलस्त्वष्टमांशकः ।। ३९ ।।

दुबलः षोडशांशः स्यान्मोहरा तु बुधैः स्मृतम् ।।

सुवर्णनिष्कं रजतनिष्कं स्याद्रूपयाभिधम् ॥ ४० ॥

वाच्या रजवर्ती तु लाहरी फलमः पणः ।।

ताम्रद्रव्यं तु खुर्दा स्याद् बस्तनं बन्धनं स्मृतम् ॥ ४१ ॥

या उल्लेखांवरून तत्कालीन नाण्यांचे कोष्टक पुढीलप्रमाणे मांडता येईल :

१९ वराह / होन= २ प्रताप

४ धरण

८ चवल

१६ दुवल

१ रुपया = १ रजतनिष्क.

१ फलम (फणम) =१ पण.

VIVEKANAND COLLEGE K... ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

लारी (लाहरी)

वरील चलनपद्धती ही विजयनगरीय चलनपद्धतीवर आधारित आहे. विविध ठिकाणी पाडलेल्या होनांमध्ये वजनाचा नसला तरी कसाचा फरक असे. पेशवेकालीन चलनात होनास प्रमुख स्थान नसले तरी तत्कालीन पेढी व्यवहारात विविध कसाच्या होनांची अदलाबदल चालत असे.

शिवकालीन कागदपत्रात होनांचे 'होन, निशाणी होन, पातशाही होन, कावेरीपाक होन' इत्यादी उल्लेख येतात. एकंदरीत शिवकालीन चलनात होन या नाणेप्रकारास मोठे महत्त्व होते.

## रजतचलन (Silver Currency) :

शिवकाळाच्या पूर्वार्धात मराठ्यांचा राज्यविस्तार कोकण प्रांतात अधिक होता." त्यामुळे लारी हे मूलत: आदिलशाही प्रणीत चांदीचे नाणे चलनात होते. राजव्यवहारकोशात यास 'रजतवर्ती' म्हटले आहे. संभाजीकालीन कागदपत्रांतही लारी नाण्यांचे बरेच संदर्भ येतात.

मात्र शिवरायांनी मराठा राज्याची चांदीची नाणी प्रसारित केली किंवा नाही याबद्दल अद्यापि वाद आहे. 'राजा शिवछ/ त्रपति' आणि 'श्रीज / गदनाप्र/सन' अशा लेखाचे रुपया परिमाणाचे नाणे मिळाले आहे. ग.भा. मेहेंदळे यांनी मात्र शिवरायांच्या चांदीच्या नाण्यांची शक्यता नाकारली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

शिवकालीन कागदपत्रांत लारी आणि रुपया यांचे उल्लेख येतात. शिवाजीमहाराजांचे स्वतंत्र रजत चलन मोठ्या संख्येने नसावे. याची काही कारणे पुढीलप्रमाणे होत..

१) विजयनगरीय चलनाचा मोठा प्रभाव शिवचलनावर होता. विजयनगरमध्ये रजत चलन मोठ्या प्रमाणात नव्हते.

२) शिवपूर्वकालीन आदिलशाही, कुत्बशाही इ. राज्यात स्वतंत्र रजत चलन नव्हते, त्यांचे एकही चांदीचे नाणे अद्याप उपलब्ध नाही.

३) शिवाजीमहाराजांचे वंशज संभाजी, राजाराम यांनी रजतचलन प्रसारित केल्याचा उल्लेख व पुरावा नाही.

तात्पर्य, १७ व्या शतकात महाराष्ट्रात मराठा राज्यप्रणीत स्वतंत्र रजत चलन 'अद्याप उपलब्ध नाही. अर्थात मोगलांचे रुपये काही प्रमाणात चलनात होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

## ताम्रचलन (Copper Currency) :

१७,१८ आणि १९ व्या शतकाच्या चलनपद्धतीत टिकून राहिलेले, खऱ्या अर्थाने मराठा राज्याचे प्रतीक म्हणजे शिवराई. शिवाजीमहाराजांनी सुरू केलेल्या या नाणेप्रकारास 'शिवराई' म्हणतात. 'श्री/ राजा / शिव' व 'छत्र / पति' असा लेख पुढील, मागील बाजूवर बिंदुमय वर्तुळात असतो.

पेशवेकाळात शिवराई प्रकारच्या नाण्यांवर फक्त 'श्री / राजा' मागे 'छत्र / 'पति' असा लेख येतो. शिवकालीन कागदपत्रांत तांब्याच्या नाण्यांचे अनेक उल्लेख येतात. उदा. रूका, तिरूका, पैसा इ.

शिवराई या तांब्याच्या नाण्याचे १५० प्रकार मिळाले आहेत; आणखीही मिळत आहेत. आवटी अभ्यासाच्या प्रतिमानाचा (Die Studies Model) उपयोग करून एकूण उत्पादित शिवराई नाण्यांची किमान संख्या ४,५०,००० मानता येते. १५

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner



शिवाजी महाराजांची तांब्याची शिवराई

# शिवछत्रपतींची चलनविषयक जागरूकता

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी हेन्री ऑक्सिंडेन हा ब्रिटिश वकील (राजप्रतिनिधी) रायगड येथे आला होता. (६ जून १६७४) राज्याभिषेकाचे औचित्य साधून त्याने काही मागण्या शिवरायांमसोर मांडल्या. राज्याभिषेकाच्या मंगल धामधुमीत आपल्या सर्वच मागण्या मान्य होतील असा त्यांचा समज होता.

ऑक्सिडेन लिहितो, 'Rajah graunted all our demands except those two articles, wherein it is expressed that our moneys shall go current in I his dominions and his on Bombay.'शिवछत्रपतींनी वरील कलमास ज्यात 'आमची (ब्रिटिश)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

नाणी तुमच्या प्रांतात चालवावीत' असे म्हटले होते ते नाकारलेले दिसते. उगाच नाही आज्ञापत्रात ब्रिटिशांसारख्यांबाबत म्हटले, 'त्याहिवरी हट्टी जात. आलें स्थळ मेलियानें सोडावयाचे नव्हेत. .

## पैसोत्पादनाधिकार (Moneyage) :

शिवकाळात 'एक देश एक चलन' तसेच 'केन्द्रीय टांकसाळ' या आधुनिक संकल्पना नव्हत्या. स्थानिक सराफ, सोनारांना परवाना देऊन विशिष्ट वजन, कस याची नाणी पाडून घेतली जात. प्रति १०० लारींमागे १ लारी, व १ मण तांब्याच्या नाण्यांमागे ५ लारी मेहनताना मिळत असे.

वरील सराफी, सावकारी पद्धतीशिवाय राजगड या दुर्गावर नाणी पाडली जात असा संदर्भ मिळतो. शिवकालीन कागदपत्रीय संदर्भ पेशवेकाळाच्या तुलनेत खूपच कमी आहेत, शिवकालीन राज्याचा विस्तार आणि अर्थव्यवस्था यांची विस्तारवादी पेशवेकाळाशी तुलना करता हे साहजिकच आहे.)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

## नाणकोत्पादन क्षमता (Mintability) :

मोगल कालखंडाच्या संदर्भात नाणकोत्पादनक्षमतेचा विचार शिरीन मोसवी यांनी केला आहे. १७ शिवकाळाच्या संदर्भात असा अभ्यास झालेला नाही. कारण त्याला काही मर्यादा पडतात, त्या पुढीलप्रमाणे,

१) शिवकालीन राज्यविस्तार याच्या मर्यादा,

२) नाण्यांवर टांकसाळस्थळे (Mintplaces) अंकित केलेली नाहीत.

३) शिवकालीन चलन हे अंतर्गत मूल्याधारित, कालोल्लेखरहित चलन होते. आधुनिक नाणकशास्त्रात चलनातील नाणकसंख्येबाबत नवनवीन प्रयोग समोर येत आहेत. यामुळे शिवकाळाच्या संदर्भात वरील स्वरूपाच्या अभ्यासाची गरज आहे.

## शिवकाळाचे आर्थिक स्वरूप आणि वित्तीयीकरण:

शिवकाळ वा १७ वे शतक हा मध्ययुगीन भारतीय इतिहासातील एक कालखंड होता. ब्रिटिश अंमलापूर्वीच्या या काळात भारतात भांडवलशाही विकसित झाली होती का, असल्यास किती प्रमाणात, नसल्यास का नाही इत्यादी महत्त्वपूर्ण प्रश्नांची चर्चा विद्वानांनी केली आहे." भारतीय संदर्भात 'मध्यमवर्गीय भांडवलशाही विकासाच्या क्षमता असूनही जातिव्यवस्थेची

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

स्थितिशीलता व नोकरशाहीची हुकूमशाही प्रवृत्ती त्यामुळे प्रत्यक्षात असा विकास शक्य झाला नाही' असे मत डॉ. श्री. म. तथा राजा दीक्षित यांनी मांडले आहे.

वरील विवेचनाच्या प्रकाशात शिवकाळातील काही आर्थिक तथ्यांचा विचार करावा लागतो.

१) शिवकालीन महाराष्ट्रात 'उपजीविकाप्रधान' प्रकारची शेती हाच प्रमुख जीवनोपाय असल्याने पैशाच्या स्वरूपातील व्यवहारांना मर्यादा होती.

२) 'राजभाग' (King's Share) हा 'नख्त' (रोख) व 'ऐनजिनसी' (वस्तुरूप) प्रकारचा (मिश्र) होता.

३) पेढीव्यवहार मोठ्या प्रमाणात विकसित झालेला दिसत नाही. त्याबाबतचे पुरावे उपलब्ध नाहीत.

शिवकालीन महाराष्ट्रातील वित्तीयीकरणाबाबत स्ट्यूअर्ट गॉर्डन यांनी स्थानिक दाने (Local Grants) या वस्तुरूपात आहेत, तसेच शिरवळजवळील शेताच्या साऱ्याबाबत मागणी धान्यरूपात होती असे दाखवून, 'महाराष्ट्रात विशेषतः देशावर वित्तीयीकरण सामान्यतः निम्न दर्जाचे होते. असे मत मांडले आहे. '१६व्या शतकामध्येदेखील बऱ्याच क्षेत्रांमध्ये व्यापार चालत होता आणि काही प्रमाणात पैशाचा उपयोग केला जात असे'. स्ट्यूअर्ट गॉर्डन यांच्या विवेचनावरून १६ व १७व्या शतकात मोठ्या प्रमाणात वित्तीयीकरण झालेले नव्हते हे तत्थ्य लक्षात येते.

COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964

Scanned with CamScanner

शिवकालीन महाराष्ट्रावर लिहिणाऱ्या डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी, 'मध्ययुगीन महाराष्ट्रात, शेती ही एकच प्रमुख जीवनपद्धती होती. तसेच या प्रदेशात वित्तीय देवाणघेवाण फारच मर्यादित स्वरूपात होती', असे मत मांडले आहे.

प्रत्यक्षात १७व्या आणि १८व्या शतकातील वित्तीयीकरणाचा स्वतंत्र स्वरूपाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टिकोनातून १९व्या शतकाची पार्श्वभूमी म्हणून १८व्या शतकाची मौलिक चिकित्सा प्रा. डॉ. अरविंद देशपांडे यांनी केली आहे. त्यांच्या मते, "तत्कालीन अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणात शेतीप्रधान होती आणि ही। शेती मुख्यतः उपजीविकाप्रधान होती. तिला व्यापाराचे स्वरूप नसले तरीही, अर्थव्यवस्था स्थिर होती. या गावगाडा पद्धतीने मराठ्यांना आर्थिक स्थिरता दिली,' ज्यामुळे मराठी सैन्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षेस प्रेरणा मिळाली".

एकंदरीत, १७ व्या शतकाच्या संदर्भात व्यापक वित्तीयीकरण घडले नव्हते. असे अभ्यासकांचे मत आहे. या संदर्भात काही बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे!

१) अभ्यासकांनी शिवराज्याभिषेक वेळी प्रांताची लोकसंख्या ही ६५ लाखांच्या घरात मानली आहे.

२) कोकणातील व्यापारी बंदरे, कोकण-देश यांतील तीर्थक्षेत्रे, व्यापारी पेठा वगळता मोठ्या आर्थिक उलाढालीची शक्यता कमी होती.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

३) शिवकालीन किल्ले हे परगण्यावरील नियंत्रणाचे व राजस्व जमा करण्याचे केंद्र मानल्यास धान्यरूप, रोख महसूल मराठा राज्यातील दुर्गम प्रदेशातून जमा होत असे.

या बाबींच्या साहाय्याने शिवकाळातील वित्तीयीकरणाबाबत अध्ययन करणे शक्य आहे, शिवराज्याभिषेकाच्या वेळची लोकसंख्या लक्षात घेता इतर पुराव्यांच्या साहाय्याने तत्कालीन परिस्थितीत वित्तीयीकरणाचा विचार करता येईल आणि मोठ्या आर्थिक उलाढालींची शक्यता जरी कमी असली तरी नक्की किती प्रमाणात वित्तीयीकरण झाले होते याचा अंदाज बांधता येऊ शकतो. उदा. शिवकालीन किल्ल्यांशी संबंधित कागदपत्रांचे अध्ययन (या गोष्टींवर प्रकाश टाकू शकेल की) दुर्गम परिसरातूनही महसूल हा होत होता व तो काही प्रमाणात रोख स्वरूपातीलही होता, या गोष्टींवर प्रकाश टाकू शकेल. या संदर्भात, मौद्रिकीकरण वा वित्तीयीकरणाचा एक मानक म्हणून नाण्यांचा विचार करता येईल. चलनातील श्रेष्ठतम नाण्यापासून कनिष्ठतम नाण्यापर्यंत जितकी जास्त विविधता तितकी आर्थिक व्यवहारातही येते. कमीत कमी भागमूल्यांकांची नाणी कागदपत्रांत व प्रत्यक्षात जितक्या जास्त प्रमाणात सापडतील तितकी ती सामान्य माणसाच्या सार्वत्रिक अल्प क्रय पातळीबाबत निर्देशन करतात. त्यामुळे वरील मुद्दयांच्या संदर्भात वित्तीयीकरणाचा अधिक सखोल अभ्यास गरजेचा आहे. शिवकालीन पत्रांचा अभ्यास याबाबत महत्त्वपूर्ण ठरतो. (पहा कोष्टक क्र.१ : शिवकालीन पत्रांत उल्लेखित नाणकप्रकारांचे क्रमबद्ध

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

कोष्टक) कोष्टक : शिवकालीन पत्रांत उल्लेखित नाण्यांच्या तत्कालीन व्यवहारातील संख्या दर्शविणारे

क्रमबद्ध कोष्टक

| नाणे / वर्ष | होन | पातशाही होन | निशाणी होन | कावेरीपाक होन | रुपया | लारी | रुका | ससगाणी | फलम | टका | अडका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६४६ | | ३४० | | | | | | | | | |
| १६४७ | | | | | | | ३ | | | ४१० | |
| १६४७ | | | | | | | २४ | | | १० | |
| १६४७ | | | | | | | १ | | | | |
| १६४७ | | | | | | | १० | | | | |
| १६४७ | | | | | | | ९ | | | | |
| १६४८ | १ | | | | | | १ | | | | |
| १६४८ | | | | | | | ६ | | | | |
| १६४८ | | | | | | | ९ | | | | |
| १६४९ | | | | | | | १ | | | | |
| १६४९ | | | | | | | १ | | | | |
| १६४९ | | | | | | | ६ | | | | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६४९ | | | | | | | ६ | | | | |
| १६४९ | | | | | | | ३ | | | | |
| १६४९ | | | | | | | १ | | | | |
| १६४९ | | | | | | | ६ | | | | |

कोष्टक : शिवकालीन पत्रांत उल्लेखित नाण्यांच्या तत्कालीन व्यवहारातील संख्या दर्शविणारे क्रमबद्ध

कोष्टक

| नाणे / वर्ष | होन | पातशाही होन | निशाणी होन | कावेरीपाक होन | रुपया | लारी | रुका | ससगाणी | फलम | टका | अडका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६५० | | ३४० | | | | | | | | २४० | |
| १६५० | | | | | | | | | | १०० | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २ | | | १९९ | |
| १९५१ | | | | | | | | | | | |
| १९५१ | | | | | | | ९ | | | | |
| १९५२ | ५० | | | | | | | | | | |
| १९५३ | १०० | १०० | | | | | १२ | | | | |
| १९५३ | ४०० | | | | | | ९ | | | १ | |
| १९५४ | | | | | | | ९ | | | ३२ | |
| १९५९ | | | | | | | २ | | | ७ | |
| १९५७ | ५९४ | | | | | | | | | ३०० | ९११ |
| १९५७ | ५०० | | | | | | | | | ७ | |
| १९९२ | | | | | | २००० | | | | | |
| १९९५ | १०० | | | | | | | | | | |
| १९९८ | | १०० | | | | | | | | ९९१ | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

(क्रमबद्ध कोष्टक) कोष्टक : शिवकालीन पत्रांत उल्लेखित नाण्यांच्या तत्कालीन व्यवहारातील संख्या दर्शविणारे क्रमबद्ध कोष्टक

| नाणे /वर्ष | होन | पातशाही होन | निशाणी होन | कावेरीपाक होन | रुपया | लारी | रुका | ससगाणी | फलम | टका | अडका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६५० | | ३४० | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | २४० | |
| | | | | | | | | | | १६९ | ५०० |
| २००० | | | | | | | | १० | | | |
| १६७० | १०० | | | | | ३० | २६ | | | १ | |
| १६७० | १०० | | | | | | | | | | |
| १६७१ | ३ | १०० | | | १०००० | | १२ | | | | |
| १६७१ | १९८ | | | | | १२५ | | | | | |
| १६७३ | २९१ | ६७४ | १०० | २०००० | | | | | | | |
| १६७४ | | २०००० | | | | | १ | | | १२५ | |
| १६७४ | | २०००० | | | | | | | | | |
| १६७६ | | | | | | | | | | ६० | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ७४ | | | | २० | | | |
| १६७७ | ४२० | | | | | | | | | | |
| १६७७ | ३६० | | | १३ | | | | | | | |
| १६७७ | | | | २५ | | | | | | | |
| १६७८ | १२५ | | | | | | | | | | |
| १६७९ | | | १८ | | | | | | | | |
| १६८० | १६५ | | ५०० | | | | | | | | |
| १६८० | | | १६५ | | | | | | | | |

सदर कोष्टकाच्या अध्ययनावरून एक गोष्ट लक्षात येते की, रुका या नाणेप्रकाराचे स्वतंत्र असे सर्वाधिक उल्लेख आहेत. एकीकडे पातशाही होनाचे वीसहजार या संख्येने उल्लेख आहेत तर दुसरीकडे रुका या अतिशय लहान भागमूल्यांकाच्या नाण्याचे एकपासून ते सव्वीस या संख्यांचे उल्लेख आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे की, शिवकाळात लहान भागमूल्यांकांची अर्थातच कमीतकमी क्रयशक्ती असणारी नाणी ही खरेदी-विक्री व्यवहारात होती. नाण्यांचा तत्कालीन अर्थव्यवस्थेत अल्प का असेना परंतु वापर होता व धीमी वित्तीयीकरणाची प्रक्रिया आढळून येते.

## समारोप :

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

अशा रीतीने शिवकाळाचा नाणकशास्त्रीय अभ्यास आपणास तत्कालीन आर्थिक वास्तवाची माहिती करून देतो. उत्तर मध्ययुगातील स्वतंत्र मराठी राज्याचे अस्तित्व प्रदर्शित करणारे, मराठी भाषक चलन म्हणून शिवाजीमहाराजांच्या सोन्याचा होन व तांब्याची शिवराई यांचा विचार करता येतो. शिवकालीन चलनाच्या संख्येला, चलनविषयक प्रशासनपद्धतींना (उदा. चलनाचे परवाने, अटी इ.) जरी मर्यादा असल्या तरी शिवकालातील प्रातिनिधिक पत्रांतील नाण्यांच्या प्रकारांचा व तत्कालीन व्यवहारातील संख्यांचा अभ्यास करता वित्तीयीकरणाच्या प्रगतीबाबतची प्रगती लक्षात येते. तरीही अनेक व्यवहार हे वस्तुरूपात होते याही तथ्याकडे लक्ष द्यावे लागते. १८व्या शतकाच्या सुरुवातीपासून या चलनपरंपरेस एक स्वतंत्र वळण लागलेले दिसते. समकालीन राज्यस्थितीचे प्रतिबिंब हे काही प्रमाणात चलनावरही पडत असते असे आढळून येते.

## पेशवेकाळाचा नाणकशास्त्रीय अभ्यास (१७०७-१८१८)

प्रास्ताविक :

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

औरंगजेब या साम्राज्यवादी मोगल सम्राटाच्या इ.स. १७०७ मधील मृत्यूनंतर, बाळाजी विश्वनाथाने दिल्लीहून आणलेल्या सनदांच्याद्वारे मराठी राज्याला लेखी वैधानिकता मिळाली. या मान्यतेबरोबरच मराठी राज्य हे मोगलांचे अंकित बनले. मोगल बादशाहचे नाममात्र वर्चस्व मान्य केलेल्या छत्रपती शाहूंच्या मार्गदर्शनाखाली 'मराठा मंडळा'तील पेशवे हे 'कुलमुखत्यार' बनले. बादशाह-शाहू-पेशवे-इतर सरदार यांच्यातील संबंधांचा विचार करता या पद्धतीच्या राज्यासाठी सामन्तशाहीचे प्रतिमान लागू होते. तत्कालीन नाण्यांवरील राजनामांचे अध्ययन करता, येते. या काळातील चलनावर छत्रपती शाहू वा पेशवे यांचे नाव दिसत नाही मोगल बादशाहाचे नाव दिसते. ही स्थिती फक्त मराठ्यांची नाही तर उत्तर राजवटींच्या तर चलनावरही मोगल बादशाहाचे नाव दिसते. उदा. शिखांची नाणी पाहिली तर हेच आढळते

वरील विवेचनातील १८ व्या शतकातील नाण्यांना सदृश मोगल Mughal) अशी संज्ञा वापरली जाते. कारण ही नाणी उत्तरेतील मोगलांच्या नाण्यांसारखी असतात परंतु या नाण्यांवरील पुढील घटकांच्यामुळे ती सहजपणे प्रांतिक सत्तांची म्हणून ओळखली जातात. उदा. मराठ्यांची नाणी इ. व यास अधिमान्यताही मिळालेली आहे. १७ विद्वत् क्षेत्रात

Scanned with CamScanner

१. या नाण्यांवरील टांकसाळनामे (Mint names) पाहता ही ठिकाणे मोगलांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली नव्हती. उदा. 'मुहियाबाद पुना' है पुणे या ठिकाणचे टांकसाळनाम अथवा 'गुलशनाबाद नासिक' टांकसाळनाम.

२. या नाण्यांवरील विविध स्थानिक चिन्हे वा टांकसाळीशी संबंधित चिन्हे ही मूळ मोगल नाण्यांपेक्षा खूप वेगळी असतात. उदा. होळकरांच्या चांदीच्या नाण्यावरील शिवलिंग हे चिन्ह, मूळ मोगल नाण्यांवर आढळत नाही. ३. या नाण्यांवरील अभिलेख (Legend) व त्याची प्रकारशास्त्रीय रचना (Typographical Arrangement) ही वेगळी असते. ४. या नाण्यांचा एकंदर पोत (Fabric) वेगळा असतो.

या संदर्भातील तथ्ये लक्षात न घेतल्याने त्र्यं. शं शेजवलकर लिहितात, "पेशवाईत तथाकथित साम्राज्याला स्वतः चे नाणेही नव्हते. महाराष्ट्रातील टांकसाळी मोगल बादशहांच्या बिरुदावलींसह फारसी भाषेत अंकित केलेली नाणी पाडीत.. शिवशाहीचे नाव केवळ तांब्याच्या शिवराई पुरतेच उरले होते. तरिही शाहूंचे राज्य स्वतंत्र होते, असे आग्रहाने सांगितले जाते.

इतिहासाचे स्वरूपच मुळी अन्वयार्थात्मक असल्याने इतिहासाचे एकांडे साधन हे पूर्णतः स्वयंसिद्ध पुरावा होऊ शकत नाही. त्याचा इतर साधनांसह अन्वयार्थ लावून काढलेले निष्कर्ष हे वास्तवाच्या कसोटीवर जास्त उतरतात. मोगल पद्धतीचे चलन हे केवळ आपण मोगलांच्या अंकित आहोत हे दर्शविण्यासाठी नसून प्रत्यक्षात हे चलन मराठ्यांच्या विशेषतः उत्तरेकडील

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

विस्तारवादास पोषक चलन आहे. नाणे ज्या परिसरात चालवायचे आहे त्या परिसरातील व्यापारी तसेच इतर लोक यांनी ते चटकन स्वीकारले पाहिजे ही आवश्यकता असते. वापरकर्त्यास मैत्रीपूर्ण (User friendly) नसेल तर ते चलन शंकास्पद मानले जाऊन त्याच्या प्रचलनात अडचणी निर्माण होऊ शकतात.

'वरील विवेचनाच्या प्रकाशात महाराष्ट्रातील सुरुवातीच्या ब्रिटिश नाण्यांचे अध्ययन केल्यास त्यावरही, पेशव्यांच्या नाण्याबरहुकूम नाणी पाडल्याने, शाहआलम बादशाहचे नाव दिसते की जो सदर नाणी पाडण्याच्या सुमारास हयात नव्हता. शेजवलकरांच्या उपरिनिर्दिष्ट विधानाच्या प्रकारचे विधान महाराष्ट्रातील सुरुवातीच्या ब्रिटिश नाण्यांबाबत करायचे झाल्यास 'ब्रिटिशांचेही स्वनामांकित चलन नव्हते म्हणजेच ते मोगलांचे अंकित होते' हे विधान सर्वस्वी तत्कालीन वास्तवास सोडून होईल.

म्हणून १८व्या शतकातील मराठा चलनातील प्रकृती अभ्यासणे, या चलनातील परिवर्तनांचा सूक्ष्म आणि स्थूल पातळींवर वेध घेणे आवश्यक आहे. १८ व्या शतकातील चलन हे पूर्वसूरी चलनाचीच प्रतिकृती होते की त्यात काही नावीन्य परिवर्तने होती?, त्या चलनाचे बाह्य व अंतर्गत स्वरूप कसे होते?, तत्कालीन आर्थिक वास्तवाचे काही प्रतिबिंब या चलनात दिसते का? थोडक्यात १८व्या शतकातील चलनात काही बदल स्थैर्य-व्यापकता दिसतात का? तसेच ब्रिटिश-

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

पूर्व चलन म्हणून त्याचे काही गुणावगुण आहेत का?, असल्यास कोणते याचा विचार करणे आवश्यक ठरते.

वरील संदर्भातील मुद्द्यांचा विचार अगत्याचा आहे.

## १८व्या शतकातील चलनपद्धती व त्यातील नावीन्य :

'सातत्य आणि बदल' हा अन्य इतिहासप्रकारांप्रमाणे चलनाच्या इतिहासाचासुध्दा नियम मानला पाहिजे. १७ व्या शतकातील चलनांचे सातत्य आणि १८ व्या शतकातील परिवर्तन हे १८व्या शतकातील चलनपद्धतीत आढळून येतात. १७व्या शतकात सुवर्णचलनास महत्त्व होते, तर १८ व्या शतकात ते रौप्य चलनास असल्याचे दिसते. याचा अर्थ असा नव्हे की १८ व्या शतकात सुवर्णचलनाचा वापर थांबला. सोन्याच्या मोहरा व होन हे प्रचलित होते. उदा. दिल्लीच्या बादशहाच्या नावे असणारी 'आलमगिरी' मोहोर तसेच 'देवराई', 'अच्युतराई', 'शिवराई' होन चलनात होते.

१ होनाचे ३ रुपये, ५६ आगे, २२४ पैसे, ६७२ रुके होत असत; तर ५ होनांची १ मोहोर असे सर्वसाधारण कोष्टक होते. दक्षिण भारतात सोन्याचे 'फणम चांदीचे', 'चक्रम' व तांब्याचे 'कासू' हे मूल्यांक (Denominations) असत.

१८व्या शतकातील चलनपद्धती पुढीलप्रमाणे-

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

भागमूल्यांक

१२ ते १५ रुपये = १ मोहोर

3% रुपये १६ आणे = १ होन = १ रुपया

४ पैसे ३ रुके = १ आणा = १ पैसा

१ रुपयाचे ½ रुपया (अधेली, आठ आणे), ¼ रुपया (पावली, चार आणे), ⅛ रुपया (चवली, दोन आणे) असे भागमूल्यांक होते.

तांब्याच्या नाण्यात ढबू (दोन पैसे) व घेला (अर्धा पैसा) व रुका (पै) असे भागमूल्यांक होते.

## नाणकनामे (Nomenclature) :

डॉ. शैलेन्द्र भांडारे यांनी ना. गो. चापेकर यांच्या 'पेशवाईच्या सावलीत' या ग्रंथात उल्लेखिलेल्या नाणकनामांचा कागदपत्रे व नाणी यांच्या साहाय्याने अभ्यास करून त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

१) नाण्यावरील मजकुरावरून पडलेली नावे: आलमगिरी, देवराई इ.

२) टांकसाळ ठिकाणावरून पडलेली नावे: चांदवडी रुपया, पुणेरी मोहोर,दिल्ली सिक्का इ.

३) नाणी पाडणाऱ्या मक्तेदारावरून पडलेली नावे: अशा नाण्यांना शाही हा प्रत्यय दिसतो उदा. प्रख्यात सरदार, सावकार मल्हार भिकाजी रास्ते यांच्या बागलकोट या टांकसाळीतील रुपयास 'मल्हारशाही' रुपया म्हणत. तर पुणे येथील दुल्लभशेटच्या रुपयास 'शेटशाही' म्हणत.

४) नाण्यांवरील भिन्नत्वदर्शक चिन्हावरून पडलेली नावे: उदा. चाकणच्या रुपयावर 'श्री' हे नाव असे. त्यास 'श्री सिक्का' तर पुण्याच्या रुपयावर गणपतीच्या हातातील 'अंकुश' या आयुधाचे चित्र असे त्यास 'अंकुशी' म्हणत.


५) नाण्याच्या प्रचलनावरून नाव: 'वसई-चाल चांदवड' याचा अर्थ चांदवड प्रकारचे वसई प्रांतात चालणारे वा 'बाघचलनी' वाघाचे चित्र असणारे बेदर येथील नाणे इ.

६) सर्वसाधारण नावे: उदा. मिठे-शुद्ध, भुंडे वा फुटके ज्यातून गैरमार्गाने धातू काढला गेला आहे. वा 'पंचमेळ'-विशिष्टत्वरहित (non-specific)

डॉ. भांडारे यांच्या वरील विवेचनातील अंकुशी या प्रकारचा रुपया चिंचवड येथेही पाडला जात होता असा उल्लेख नव्याने सापडलेल्या ब्रिटिश जाहीरनाम्यात आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner



होळकरांचा चांदीचा रुपया

## कथा पातुरच्या खजिन्याची

ही सत्यकथा इ. स. १९७४ सालची. एका लग्नात एक 'शराबी' झुलत आला आणि नवरीच्या हातावर १३ ग्रॅम शुद्ध सोन्याची मुद्रा आहेर म्हणून दिली. अकोल्यापासून साधारणतः ३० कि.मी. अंतरावर 'बोर्डी' नदीच्या पात्रात ती मुद्रा सापडल्याचे कळताच लोकांची झुंबड उडाली. पेटते टायर, पेट्रोमॅक्स इ. च्या प्रकाशात 'नाणे संशोधन सुरू झाले. नाणी सापडावी म्हणून 'गिनीदेवी' नावाची नवीन शेंदूर फासलेली शिळा उभारून काम सुरू झाले. लोकांना हजारो सुवर्णमुद्रा मिळू लागल्या. सरकारी यंत्रणेस कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

अश्रुधुराची ४ नळकांडी फोडूनही जमाव पांगेना, तेव्हा १४४ कलम जारी करावे लागले. अखेरीस ३६ किलो वजनाची; ३ हजार २६२ सुवर्णनाणी मिळाली.

इतिहासाच्या नोंदीवरून असे दिसते की, शाहजहानच्या (१५९२- १६५८) ख्वाजाजहाँ या सरदाराने बोर्डी नदीच्या पात्रात मुक्काम केला होता व रात्री आलेल्या पुरात सर्व वाहून गेले व सारा खजिना बुडाला; खजिना असावा. तोच हा पातुरचा खजिना.

## पेशवेकालीन नाण्यांचे बाह्य स्वरूप - त्यावरील लेख :

वर उल्लेखिल्याप्रमाणे शिवकालीन नाणी, पेशवेकालीन नाणी व मराठा मंडळ वा संयुक्त राज्यव्यवस्थेतील सरदारांची नाणी यांच्यावरील लेखांचा अभ्यास केल्यास, शिवछत्रपतींच्या राज्यांचे स्वातंत्र्य वा सार्वभौमत्व, (पेशव्यांच्या राज्याची) बादशाही अंकितता असलेलं पेशव्यांचं राज्य व इतर सरदारांच्या नाण्यांवरून त्यांची 'अर्धस्वतंत्रता' स्पष्ट होते.

सर्वसाधारणपणे १८ व्या शतकातील विविध राजवटींच्या नाण्यांवर (उदा. मराठे, शीख इ.) एका बाजूस बादशहाचे नाव, (वैकल्पिकपणे हिजरी तारीख) तर दुसऱ्या बाजूस त्याचे राज्यवर्ष तसेच टांकसाळ चिन्ह, टांकसाळ नाम दिसून येते.

उदा. पुणे येथील पेशव्यांच्या नाण्यांवर,

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

शाहआलम बादशाह

गाझी

सिक्का मुबारक

मानूस


मैन्ममत्

जुलुस

झर्ब

मुहियाबाद पुना

असा पर्शियन भाषा, लिपीतील मजकूर दिसतो. मात्र जुलूस या पर्शियन अक्षरातील स च्या लपेटीत टांकसाळ चिन्ह उदा. पुण्याचे चिन्ह आढळून येते. अशा प्रकारे १८ व्या शतकातील मराठा नाण्यांवर मोगल बादशहांचे नाव आढळून येते.



पेशव्यांचा पुणे टांकसाळीचा रुपया

EKANAND COLLEGE KO
EST

Scanned with CamScanner

अशा नाण्यांना नाणकशास्त्रात सदृश-मोल (Quasi Mughal) अशी संज्ञा आहे. कारण मूळ मोगल नाण्यांप्रमाणे स्थानिक चिन्ह व टांकसाळ नाम असणारी ही नाणी होत. भिन्नत्वदर्शक चिन्हे व टांकसाळनामावरून मूळ मोगल व त्यांचे अंकित यांची नाणी सहजपणे ओळखता येतात. नाण्यांवरील फारसी लेखनशैलीतील फरकावरूनही हे समजू शकते

## हिजरी सनाचे इ. स. मध्ये रूपांतर

जुन्या नाण्यांचा वा कागदपत्रांचा अभ्यास करताना हिजरी, सुहूर, फसली या कालगणना वापरलेल्या दिसतात. त्यांचे इ.स. मध्ये रूपांतर करणे गरजेचे. असते. उदा. हिजरी सनाचे इ.स. मध्ये रूपांतर करण्याची एक गणिती युक्ती आहे. उदा. हिजरी सन १००१ चे रूपांतर आपणांस करायचे आहे तर

१) हिजरी अंक / १०० करणे १००१ / १००

(दशांशात रूपांतर)

२) आलेल्या उत्तरास ३ ने गुणणे. १०.०१ x ३

= ३०.०३

NAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

या शिवाय 'जंत्री' चा वापरही करता येतो.

## नाण्यांवरील भिन्नत्वदर्शक चिन्हे

ज्यावेळी एखादी टांकसाळ नव्याने स्थापन केली जाई, तेव्हा ज्या मूळ नाण्याच्या बरहुकूम नाणी पाडावयाची असत त्यावरील एखाद्या चिन्हाचे तसेच निर्हेतुक अंकन होत राही अथवा नूतन टांकसाळधारक एखादी आकृती नाण्यावर कोरत असे. काही काळाने नाण्याची शुद्धता वा कस आणि सदर आकृती यांबाबत गृहीत धरले जाई. त्या विशिष्ट चिन्हामुळे नाणे चटकन ओळखले जाई. या चिन्हात राजनामाचे आद्याक्षर, तसेच धार्मिक चिन्हे इ. वापरली जात असत. या विविध चिन्हांमुळे वर्गीकरण (Classification), ओळख (Identification), विनिमय (Exchange) या क्रिया सुलभपणे होत असत.

## विनिमय दर (Exchange Rate) :

१. पेशवेकाळात ब्रिटिश कालखंडाप्रमाणे एक देश - एक चलन नव्हते.

२. नाणी पाडण्यासाठी केंद्रीय व खासगी टांकसाळी होत्या. त्यामुळे नाण्यांमध्ये वैविध्य निर्माण होत होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

३. नाण्याचे मूल्य हे अंतर्गत (Intrinsic) असल्याने नाण्यातील मूल्य हेच त्याचे मूल्य असे.

धातूचे

४. नाण्यांतील धातूचा कस विभिन्न व स्थलसापेक्ष असल्याने किंमतीत फरक असे. .

पेशवेकालीन सराफ-सावकार तसेच पेढींचा हा एक महत्त्वाचा व्यवसाय होऊन बसला. पेढीव्यवहार कागदपत्रात सातत्याने हे विनिमयाचे उल्लेख आढळतात

विनिमयदरासाठी नाणेपारखणी महत्त्वाची होती. या प्रक्रियेत नाण्याच्या बाजूवर कानस घासून अथवा नाण्यावर लहानसे छिद्र पाडून अंतर्भागातील धातू पाहत असत. तसेच आम्लाचा वापर करून नाणे पारखत असत व नाणे पारखून झाले हे सिद्ध करण्यास एखादे लहानसे चिन्ह उमटवले जाई. नाणे जितक्या जास्त प्रमाणात पारखले जाई, तितक्या प्रमाणात त्याचे स्वरूप बिघडत जात असे, कारण त्यावर अनेक छिद्रे पाडली जात.

क्ल्युन्स याने आपल्या निवेदनपत्रात 'कोश', 'निर्मळ छापी', 'मध्यम छापी'. व 'नरम छापी' अशा नाण्यांच्या प्रती होत्या असे म्हटले आहे. ३५ ते या नाण्यांच्या स्वरूपावरून होय.

१७व्या शतकाच्या पूर्वार्धात स्थापन झालेल्या मराठा राज्याच्या उदयाविषयी ग्रँट डफ पासून ते आधुनिक काळात इरफान हबीब यांच्यापर्यंत अनेकांनी आपले मांडले आहे. मध्ययुगीन पद्धतीचा प्रादेशिक राष्ट्रवाद मानले गेलेले मराठा राज्य शिवाजीमहाराजांनी प्रणालीबद्ध प्रशासनयंत्रणेच्या साहाय्याने एका स्थिर पायावर उभे केले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

१६८२ नंतर 'हिंदुस्थानातून' (उत्तरेतून) दख्खनेत उतरलेल्या औरंजेबाने विजापूर, गोवळकोंडा जिंकून मराठ्यांचेही राज्य जिंकण्याचा प्रयत्न केला. छत्रपती संभाजी, राजाराम, ताराबाई व इतर मराठा सरदार यांच्या प्रखर प्रतिकारामुळे ते शक्य झाले नाही. या संग्रामाच्या काळात मराठ्यांनी आपल्या पारंपरिक राज्याबाहेर पडून मुलुखगिरी केली. या अनुभवाच्या जोरावर १८ व्या शतकातील विस्तारवादास पोषक पार्श्वभूमी निर्माण झाली. स्वराज्याचे रूपान्तर साम्राज्यात होण्याची प्रक्रिया घडून आली. बाळाजी विश्वनाथांच्या दिल्ली स्वारीपासून मराठी राज्याला केवळ मोगलांची अधिमान्यताच मिळाली नाही, तर मराठी राज्याचे प्रभुत्व दक्षिणोत्तर स्थापन झाले. मराठी राज्याच्या विस्ताराबरोबरच एतद्देशीय चलन व चलनपद्धतीसमोर काही प्रश्न नव्याने उभे राहिले. ते पुढीलप्रमाणे,

## नाणकसंख्या :

सभासद बखरीसारख्या साधनांवरून आपणास १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात चलनात असणाऱ्या जुन्या, नव्या नाण्यांची माहिती कळते. " मात्र १८व्या शतकाच्या आरंभापासून जास्त अचूकपणे, औरंगजेबाच्या दख्खनमधील वास्तव्यापासून रुपया या मोगलप्रणीत चांदीच्या नाण्यास विशेष महत्त्व येताना दिसते. औरंजेबाने बारामती, पुणे, संगमनेर किंवा संगमेश्वर इत्यादी ठिकाणी टांकसाळीतून रुपये पाडलेले आढळतात. या कालखंडातील चलनव्यवस्था ही १८व्या शतकातील

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

विस्तारवादास पुरेशी नव्हती हे मराठ्यांनी नव्याने स्थापलेल्या टांकसाळीच्या संख्येवरून लक्षात येते." मोगल नाण्यांच्या संदर्भात सुरत टांकसाळीतून पाडलेल्या नाण्यांच्या संख्येच्या अध्ययनाने त्याची नाणकोत्पादनक्षमता (Mintability) याचा अभ्यास झाला आहे. अद्‌यापि १८व्या शतकातील मराठा चलनाबाबत असा अभ्यास झालेला नाही. आवटी-अध्ययनाचे प्रतिमान (Die Studies Model) याबाबत उपयुक्त ठरू शकेल.

मराठ्यांच्या एकूण ११७ टांकसाळींपैकी केवळ अहमदाबाद, अलिबाग, अथणी, बागलकोट, बारामती, सहारनपूर (उत्तर प्रदेश) या प्रातिनिधिक ४० टांकसाळीतून उत्पादित नाणकप्रकारांचा आढावा घेतला तरी ७१ प्रकारचे रुपये उत्पादित झालेले दिसतात.

## आवटी अभ्यासाचे प्रतिमान :

सेलवुड या विद्‌वानाने प्रात्यक्षिक आणि सांख्यिकीय माहितीच्या आधारे असे मांडले आहे की, आवटी हत पद्‌धतीत (Die Struck) २ आवटी (Dies) वापरल्या जातात. जमिनीत बसवलेल्या ऐरण आवटी (Anvil Die) व वर धरलेल्या हातोडा आवटी (Hammer Die) यांच्या संयोगातून कमाल १०,००० नाणी उत्पादित होतात. पण हातोडा आवटी सतत हालती असल्याने त्यातून

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

कमाल ५,००० नाणी उत्पादित होतात. म्हणजेच २ हातोडा: १ ऐरण असे प्रमाण १०,००० नाणी पाडले. ५,००० या संख्येचा मध्य २,५०० वा ३,००० गृहीत धरल्यास (सरासरी), एक नाणक प्रकार संभावित २,५०० - ३,००० नाण्यांचे अस्तित्व सांगू शकतो.

पेशव्यांच्या / मराठ्यांच्या पातिनिधिक अशा ६ टांकसाळींतून जर ७१ प्रकारचे रुपये पडत असतील तर, ७१ x ३,००० = २,१३,००० दोन लाख तेरा हजार नाणी (किमान) उत्पादित झाल्याचे लक्षात येते. ११७ टांकसाळींतील एकूण नाणेप्रकारांना तीन हजार या संख्येने गुणल्यास, एकूण (सरासरी नाणे प्रकार) ४२ ४०० x ३००० = १२,००,००० (बारा लाख) नाणी (फक्त चांदीची) उत्पादित केलेली होती. यावरून आपणास १८व्या शतकातील नाणकसंख्येचा (यात फक्त नव्याने उत्पादित केलेल्या चलनाचा विचार केला आहे) आकडा समजतो..

## टांकसाळी (Mints) :

मध्ययुगीन कालखंडात टांकसाळी या प्रामुख्याने खासगी प्रकारच्या असल्या तरी १७व्या १८व्या शतकांत टांकसाळींसाठी मार्गदर्शक नियम व अटी सरकार निर्देशित करीत असे. त्याचप्रमाणे ठराविक मानकाप्रमाणे नाणी पाडली जातात W किंवा नाही याबाबत दक्षता घेतली जात असे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

मध्ययुगात, विशेषतः उत्तरार्धात, टांकसाळी या मक्त्याने चालवण्यासाठी दिल्या जात असत, जास्तीत जास्त चढ देणाऱ्यास टांकसाळ स्थापन करण्याची वा चालवण्याची परवानगी दिली जात असे. या परवान्यापोटी जे शुल्क (Fee) सरकारात भरले जाई, ते सरकारच्या उत्पन्नाचे एक साधन बनले होते. १७ व्या शतकाच्या तुलनेत १८व्या शतकात टांकसाळी मोठ्या प्रमाणात स्थापन केल्या गेल्या. त्यासाठी खास उत्तेजन दिले गेले होते.'

## मराठ्यांच्या टांकसाळीची स्थळे आणि विस्तारवाद :

ग.ह.खरे, तसेच के.के. महेश्वरी व केनेथ् विगिन्स् यांनी मराठा नाणकशास्त्राचे विशेष संशोधन केले आहे. महेश्वरी आणि विगिन्स यांनी सखोल सचित्र मांडणी केली आहे.

मराठ्यांनी त्यांच्या विस्तारवादास पोषक, उपयुक्त अशा अनेक टांकसाळी स्थापन केल्या, पण या ठिकाणी एका गोष्टीचे भान राखणे आवश्यक आहे की, यांतील काही टांकसाळी अगदी अकबराच्या काळापासून होत्या, " काही दरम्यानच्या काळात बंद पडल्या होत्या. त्यातच मराठ्यांनी नव्याने नाणी पाडणे सुरू केले.. ही गोष्ट त्या नाण्यांवरील वैविध्यपूर्ण चिन्हे, टांकसाळचिन्हे, तारीख, पर्शियन लेखन यावरून समजते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

या पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मराठ्यांच्या एकूण ११७ टांकसाळी ज्ञात आहेत. वायव्येस मुलतान, उत्तरेस सहारनपूर, दक्षिणेस गोकाक होत्या. या टांकसाळीच्या स्थापनेच्या वा एकूण कार्यकालाच्या अभ्यासानेही विस्तारवाद समजण्यास मदत होते. (पहा कोष्टक क्र. २)

## टांकसाळींचे व्यवस्थापन :

१८ व्या शतकातील वाढीव नाण्यांची गरज, विस्तारवादास पोषक अशा टांकसाळीची स्थापना यामुळे, १८ व्या शतकातील शासकीय कागदपत्रांत टांकसाळीच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात अनेक उल्लेख येतात.

पेशवाईत सरकारी टांकसाळीच्या व्यवस्थापकास कमाविसदार असे म्हणत असे नाशिक येथील सरकारी टांकसाळीच्या सनदेवरून समजते. टांकसाळीतील कच्चा माल सरकार पुरवीत असे आणि कामगारांना, कारागिरांना रोख वेतन दिले जाई. सरकारी सनदेत या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख असे. चांदवड (नाशिक) येथील टांकसाळीच्या सनदेवरून तत्कालीन टांकसाळीची कार्यपद्धती

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

समजते. टांकसाळीत लोहार, सोनार, घणकरी, आतेकरी, शिक्के (आवटी) करणारा, टिकली करणारा असे कसबी कारागीर असत.

सावकाराकडून आणलेल्या धातूची शुद्धता पडताळून, आतेकरी तो वितळवत असे. गोल दंडाकृती धातूच्या तुकड्यातून टिकल्या (चकत्या-Planchet) पाडल्या जात. . ऐरण आवटी आणि हातोडा आवटी यांच्या मध्ये ठेऊन नाणी पाडली जात. १ मात्र उत्तरेकडील टांकसाळीच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर तपशील उपलब्ध नाही. महाराष्ट्रातील टांकसाळीच्या संदर्भात अलिबाग, तळेगाव, पुणे ४ येथील सनदा प्रसिद्ध आहेत. तात्पर्याने, १८ व्या शतकातील चलनव्यवस्थेसमोरील प्रश्नात टांकसाळव्यवस्थापन हाही घटक होता...

## नाणकविषयक गुन्हेगारी :

टांकसाळींची मोठी संख्या, नाण्यांची संख्या यामुळे नाणकविषयक गुन्हेगारीचेही संदर्भ मिळतात. अर्थात् चलनव्यवस्थेच्या संदर्भात गुन्हेगारी हा प्रश्न नवीन नाही. उदा. पुणे येथील गोविंद नाईक देवळे याने खोटी नाणी पाडल्याबद्दल त्यास २,००० रुपये दंड करण्यात आला. " तर नाशिक येथील आनंदी सोनार याच्याकडून ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला. " तळेगाव दाभाडे येथील सदाशिव व बाळा तळेगावकर, तुका चिंचवडकर व महिपती चिंचवडकर हे खोटी नाणी करताना सापडले. त्यांना दंड केलेला दिसतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

एकंदरीत १८ व्या शतकात नाणकविषयक गुन्हेगारीबाबत शासनाने कठोर पावले उचलेली आढळतात.

१८व्या शतकात निर्माण झालेल्या चलनविषयक प्रश्नांची सोडवणूक प्रामुख्याने दोन मार्गांनी घडलेली दिसते.

अ) शासकीय पातळी

ब) व्यवस्थात्मक पातळी

## शासकीय पातळी

या पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे टांकसाळी या मुख्यतः दोन प्रकारच्या होत्या १) खासगी २ ) शासकीय चलनाच्या पुरवठ्यासाठी टांकसाळी स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले गेले. उदा. पुण्याचा मुख्य सावकार दुर्लभशेट यास टांकसाळ स्थापनेस प्रोत्साहन दिले होते. यात शासकीय टांकसाळी अत्यल्प होत्या. मुख्यत: खाजगी टांकसाळीच संख्येने अधिक होत्या.

## टांकसाळी संदर्भातील सनदा :

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

नाणी पाडण्यासाठी परवाना मागण्याची पद्धती शिवकाळातही दिसते. एका शेठाने लारी पाडण्यासाठी टांकसाळीचा परवाना मागितला.५८ तेव्हा ५ वर्षांसाठी, दर १०० लारींच्या उत्पादनामागे १ लारी तर, १ मण तांब्याची नाणी पाडण्यासाठी ५ लारी हा मेहनताना होता.

१८व्या शतकातील पेशव्यांच्या राज्यातही या पद्धतीची अनेक कागदपत्रे उपलब्ध आहेत. उदा. नागोठणा येथील बाळाजी बापूजी याला ३ वर्षांसाठी तांब्याचे पैसा नाणे पाडण्यास मान्यता दिली गेली. पहिल्या वर्षी ५० रु, दुसऱ्या वर्षी ७५ रु., तर तिसऱ्या वर्षी १००रु., असे परवानाशुल्क होते. ६० सातान्याजवळील माहुली येथे शिवराई पैसे पाडण्यासाठी अशाच अटींवर परवानगी दिली गेली. ६१ अशाच सनदा पांडुरंग मुरार, दुल्लभशेट गोविंदजी आणि गोविंद पांडुरंग यांनाही दिल्या गेल्या होत्या.

## सनदांमधील नियम:

सनदांमध्ये : तीन संदर्भातील नियम आढळतात ते पुढीलप्रमाणे : मुख्यतः

१) शुद्धता व वजन: नाण्यामध्ये भेसळ किती वापरावी याचे मार्गदर्शन सनदांमध्ये केलेले आहे. उदा. 'धारवाडी' व 'जमखिंडी' या दोन प्रकारच्या रुपयांत चार गुंजा जळ जाणे (हीण असणे) चालत असे. ३ तांब्याच्या नाण्यांच्या बाबतीत शिवराई पैसा ९ मासे, आलमगिरी पैसा १३ मासे तर ढबू १८ मासे वजनाचा असावा असेही मार्गदर्शन दिसते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

२) प्रमाण नाण्यांचे उल्लेख : १८ व्या शतकातील नाणक विषयक कागदपत्रांचे अध्ययन करताना प्रमाण नाण्यांचे अनेक उल्लेख आढळतात. उदा. 'सुरती पद्धतीचे रुपये पाड नयेत. जुन्या फुलचेरी सारखे जयनगरी रुपये पाडावे. मोहरा जुन्या औरंगाबादी प्रमाण पाडाव्या'." एकंदरीत शासकीय पातळीवर नाण्यांचा कस इत्यादी बाबतीत मोठ्या प्रमाणात काळजी घेतली जात असे.

## सरकारी नियंत्रण-कठोर नियम आणि प्रत्यक्ष पाहणी :

मुळातच टांकसाळ घालणाऱ्या मक्तेदारास लेखी सूचना दिल्या जात असत. सरकारी व खाजगी दोन्ही प्रकारच्या टांकसाळींच्या बाबतीत नियम पाळले जातात वा नाही याची पाहणी होत असे. 'सरकारचे मनास' आल्यासही अशी पाहणी- चौकशी होई.

चांदवड येथील टांकसाळ पूर्ण वजनाचे 'खरे' रुपये पाडत नाही म्हणून बंद करण्यात आली होती. ६६ तर चिंचवड टांकसाळीतील गैरव्यवहारासाठी शासनाने समिती नेमली होती. (इ.स. १७६६-६७).

'तळेगाव दाभाडे येथील टंकसालीत... चार असामी याणी खोटे नाणे केले. सबब पुण्यात आणून अटकेत ठेविले. त्याचे मुदे लेहून पाठविणे'. ६८ ...... त्याणी खोटे नाणे कसकसे केले अशा

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

रीतीने नाणकविषयक गुन्हेगारी संदर्भात जागरूकता आढळते. या नियंत्रणाच्या मार्गाने चलनविषयक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला जाणवतो.

## व्यवस्थात्मक पातळी :

१) सराफांची तपासणीपद्धती व सराफी चिन्हे

२) पेढी व्यवहाराचा विकास (चलनाची अदलाबदल, विनिमय दर इ.)

### १) सराफांची तपासणी पद्धती व सराफी चिन्हे :

मागे उल्लेख केल्याप्रमाणे मराठाकालीन चलन हे अंतर्गत मूल्यावर आधारित चलन होते. यामुळे नाण्यातील धातू, त्याची शुद्धता, वजन या घटकांना महत्व होते. १८व्या शतकात मराठा राज्याचा विस्तार (सध्याच्या) भारतभर व त्याही बाहेर झाला. लूट, खंडणी, नजराणे, व्यापार, इत्यादी अनेक मार्गांनी विविध प्रांतांतील, विशेषतः उत्तरकेंद्रित धोरणामुळे, उत्तरेकडील वैविध्यपूर्ण चलनांची आवक महाराष्ट्रात झाली. तसेच महाराष्ट्रातील मराठा राज्यप्रणीत चलन हेही दूरदेशी पोहोचले. १८ व्या शतकातील कागदपत्रांत अगदी 'इस्तंबोली' नाण्यांचेही उल्लेख आहेत. ६९ ही सर्व विविध ठिकाणची विविध प्रकारची नाणी तपासणारी 'केन्द्रीय यंत्रणा' नसल्याने

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

'पोतदार' हा सरकारी अधिकारी व खाजगी पातळीवर सराफ सावकार ही नाणी तपासत असत.

नाणे कोणत्या टांकसाळीचे आहे, त्यावरील चिन्हे कोणती? इत्यादींची सांगड नाण्यातील धातूच्या शुद्धतेशी घातली जाई. नाण्यांच्या बाजूवर कानस मारून धातुपरीक्षा करणे, नाण्याच्या पृष्ठभागावर लहानसा खड्डा करून व छिद्र पाडून आत शुद्ध धातू आहे की नाही पाहणे, कसवटी तसेच आम्ल यांच्या सहाय्याने धातूची शुद्धता तपासणे हे काम चालत असे. हे काम पारखणी पूर्ण झाल्यावर नाण्याच्या जाड कडेवर (Thick edge) चिन्हे उमटवली जात. यात धार्मिक चिन्हे, रेषा. आकृती दिसतात. डॉ. शैलेंद्र भांडारे यांनी असे नमूद केले आहे, की "ही चिन्हे पारख्यांची ओळख पटवीत असे वाटत नाही". • पण असे असते तर ही चिन्हे उमटवण्याची आवश्यकताच नव्हती. किमान एखाद्या प्रांतातील सराफाने अंकित केलेले नाणे 'त्या' चिन्हांसह 'त्या' परिसरात तरी प्रचलनात रहात असे. विशेष म्हणजे अशी सराफी चिन्हे फक्त दख्खनमधील नाण्यांवरच आढळून येतात. ७१ शुद्धतेबाबतचा शासकीय आग्रह तसेच सराफी सावकारीचा स्वायत्त विकास आणि विभिन्न पद्धतींचे कस ही याची कारणे होत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

## पेढी व्यवहाराचा विकास:

महाराष्ट्रातील पेढी व्यवहारांच्या संदर्भात अद्‌यापि विशेष काम झालेले नाही. खांडेकर यांचा 'पेढीचे व्यवहार व इतिहास' (पुणे, १९२२), ७२ तसेच शाळिग्राम यांचा 'मुंबईचा व्यापार' यांचा अपवाद वगळता पेढीव्यवहारांवर स्वतंत्र ग्रंथ नाहीत.. काही निवडक लेखांमधून याबाबत अभ्यास मांडला गेला आहे. ७३ दीक्षित-पटवर्धन यांच्या पेढीचा इतिहास पाहता असे दिसते की, हरि दीक्षित व विश्वनाथपंत पेठे यांचा पेशव्यांशी संबंध आला. ही पेढी प्रथम नाशिक (वर्ष अज्ञात) नंतर औरंगाबाद (इ.स. १७२२) येथे होती. त्यांना बाजीराव पेशव्यांनी पुण्यास (इ.स. १७२९) बोलावले. त्यांच्या जमाखर्चाच्या वह्या इ.स. १७५०-१८३६ अशा उपलब्ध आहेत. त्यात रोजनामा, खातेवही व नामेवही असे प्रकार आहेत.

या वह्यांतील व्यवहाराचे दोन भाग दिसतात. ७४

१. पोते- नाण्यांची प्रत्यक्ष उलाढाल.

२. परभारे हिशेबी उलाढाल.

व्यवहाराच्या सोयीसाठी निरनिराळी खाती दिसतात.

१. व्याज खाते २. बट्टा खाते ३. हुंडणावळ ४. किरकोळी. यांचा एक वर्षाचा जमा ३३,८७,३८१-३-० (रू. आणे - पै) तर खर्च ३०,७७,९७७-११-० एवढा आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

या पेढी व्यवहारात 'मोहोरा' खाते स्वतंत्र होते. पेढीचे सर्व व्यवहार रुपये, अधेल्या, पावल्या, खुर्दा, सिवराई यात चाले. यात 'आट मांडणावळ' म्हणजे झिजलेले रुपये आटवून त्याची चांदी बनवलेली आढळते. ज्या नाण्यांवरील मजकूर ७५ स्पष्टपणे दिसत नाही, असे रुपये आटवण्यासाठी देत असत.

याशिवाय पेढी या नाण्यांची अदलाबदल, तसेच विशिष्ट नाण्यातच रक्कम अदा करणे याही गोष्टी करीत असत. उदा. 11. बट्टा जमा सुरती रु. ६ त्यांचे अलीबागी केले'.७६ किंवा ||= बट्टा खर्च अलीबागी रु. १० त्यांचे चिंचवड चलनी केले त्यास बट्टा दर ६ - प्रमाणे मुक्काम हरेश्वर' (कोकणातील हरिहरेश्वर ) असे उल्लेख वैद्य दप्तरांत सापडतात.

साधारणतः १८व्या शतकाच्या प्रथमार्धात सावकारी तसेच पेढी व्यवहार विकसित होताना दिसतो. दीक्षित-पटवर्धन यांसारख्या पेढी मोठ्या प्रमाणात उलाढालीत गुंतलेल्या होत्या. हुंडी व्यवहारही बऱ्याच प्रमाणात विकसित होत होता. 'हुंडणावळ' ही रुपयात (नख्त) असे. विशेष म्हणजे कोणत्या चलनात हुंडीची रक्कम अदा करायची ते निर्दिष्ट करीत, व्यापाऱ्याकडे भरलेले चलन व त्याने द्यायचे चलत ही भिन्न असल्यास बाजारभावाप्रमाणे बट्टा आकारीत असत.

तात्पर्याने, स्वयंस्फूर्तीने तसेच पेशव्यांसारख्या सत्ताधीशांसारख्या प्रोत्साहनाने निर्माण झालेल्या पेढी व्यवहार- सराफी - सावकारी या यंत्रणांनी चलनाचा विकास- कसाचा प्रश्न - विनिमयात्मक गरजा भागविण्याचा प्रयत्न केलेला जाणवतो. पेढी व्यवहारांच्या सोबतच सावकारी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

टपाल विकसित होताना दिसते. प्रसंगी सावकारी टपालात राजकीय महत्वाच्या बातम्यांची उपस्थितीही आढळते. उदा. 'पानिपतच्या लढाईत विश्वासराव पेशवे वीरस्वर्ग पावले'. ही बातमी दीक्षित-पटवर्धन पेढी कागदपत्रात सापडते.

एकंदरीत पेढी तसेच चलनविनिमय-सावकारी यांचाही समावेश व्यवस्थात्मक पातळीवरील घटकात होतो.

## समारोप :

पेशवेकाळाचा नाणकशास्त्रीय अभ्यास हा तत्कालीन अनेक पैलूंवर प्रकाश टाकतो. छत्रपती शिवाजीमहाराजांनी खंबीर पायावर स्थापन केलेल्या स्वराज्याचे रुपांतर सुराज्यात करून त्याचे साम्राज्यात रूपांतर करण्याची प्रक्रिया सुरू केली. मोगल-मराठा संघर्षाच्या दिव्यातून पार पडलेल्या मराठी राज्याने पेशवेकाळात विस्तारवादी धोरण स्वीकारून दक्षिणोत्तर आपले प्रभुत्व निर्माण केले. हे सर्व बदल घडताना चलनातही मोठ्या प्रमाणात बदल घडताना दिसतात. मात्र या व्यवस्थेबरोबरच काही प्रश्न नव्याने उभे राहताना दिसतात. उदा. विस्तारवादास आवश्यक

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

नाणकसंख्या, नाणकप्रकार, टांकसाळसंख्या, विनिमयाचे प्रश्न, वाढती नाणकविषयक गुन्हेगारी इ. या प्रश्नांची सोडवणूक ही दोन मार्गांनी झालेली दिसते. शासकीय पातळी व व्यवस्थापक पातळी हे ते दोन मार्ग होय. टांकसाळींची वाढवलेली संख्या, टांकसाळव्यवस्थापनाचे नियम, नाणविषयक लिखित नियम व अधिमान्य सनदा, नाणकविषयक गुन्हेगारांना कठोर शासन तसेच चलनव्यवस्था सुधारणेचे काही प्रयोग याद्वारे शासकीय पातळीवर उपाययोजना केलेल्या जाणवतात.

चलन ही गोष्ट केवळ शासकीय राहू शकत नाही. तत्कालीन संदर्भात नाणकोत्पादन केवळ केन्द्रीय तसेच फक्त शासकीय नसल्याने, चलनासंदर्भातील प्रश्न हे व्यवस्थात्मक पातळीवर सोडवण्याचाही प्रयत्न झालेला दिसतो. सावकार- सराफ, नाणे उत्पादक, व्यापारी यांचा तत्कालीन अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असल्याने त्यांनी व्यवस्थात्मक पातळीवर नाणकविषयक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

आज्ञापत्रातील साहुकारांची भलावण प्रसिद्ध आहे. परंतु १८व्या शतकाच्या प्रथमार्धाच्या अखेरीपासून पेढीव्यवहार विकसित होताना दिसतात. ठेवी, व्याज, कर्जे तसेच चलनाची अदलाबदल यांसह पेढींनी तत्कालीन आर्थिक गरजा भागवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सावकारांनी मराठ्यांच्या आक्रमक विस्तारवादास 'तयार वित्तपुरवठा' (Ready Finance) केलेला

VIVEKANAND ... KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

दिसतो. या सर्व आर्थिक बदलांचे प्रतिबिंब तत्कालीन नाणी व चलनपद्धतीत काही प्रमाणात दिसते. मात्र मराठा विस्तारवादास पूरक असे महाराष्ट्रीय सराफ -सावकार-पेढी इ. चा विकास व अंगभूत क्षमता (उदा. पतपुरवठा इ.) हे मर्यादित होते व समाईक भांडवलावर आधारित कंपनीसारख्या गोष्टीत त्यांचे रूपांतर होऊ न शकल्याने या मर्यादा होत्या. हे रा. भा. पाटणकर यांचे मत या ठिकाणी लक्षात ठेवावे लागते.

जरी 'मध्ययुगीन' पद्धतीचे असले तरी मराठा चलनात परिवर्तनाच्या काही प्रसुप्त प्रेरणा दिसतात. आधुनिक चलनपरंपरेच्या एक देश-एक चलन या तत्वाचा असफल का असेना परंतु प्रयोग केल्याचे सनदा, पत्रांवरून सिद्ध होते. शासनाने चलनव्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरवल्याचेही पत्रांवरून दिसते.

भारतातील आधुनिक चलनाची पायाभरणी ही ब्रिटिश कालखंडात झाली आणि या ब्रिटिश कालखंडाचा पूर्वसूरी कालखंड म्हणून मराठा कालखंडाच्या चलनपद्धतीचे महत्त्व तितकेच आहे.

## संदर्भ आणि टिपा

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

पुढील ग्रंथांत शिवकालीन चलनाविषयी अभिलेखीय माहिती दिली आहे. Dr. A. R. Kulkarni, Maharashtra in the Age of Shivaji, Pune, 1969. श्री. ग.भा. मेहेंदळे यांनी 'श्री राजा शिवछत्रपती', खंड १, भाग २, पुणे, १९९९.

तर, खालील ग्रंथात मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित उपलब्ध सर्व नाण्यांची तारीखवार प्रकाशचित्रांची सविस्तर तालिका दिली आहे.

K. K. Maheshwari, K. W. Wiggins, Maratha Mints and Coinage. Nashik, 1989.

१. Frank Perlin, 'Money-use in Late Pre-colonial India and the International Trade in Currency Media', in J. Richards (ed.) The Imperial Monetary System of Mughal India, New Delhi, 1987, p. 246.

२. ४. A. R. Kulkarni, Maharashtra in the Age of Shivaji, Pune, 1969, p.237. K.K.Maheshwari, Kenneth W. Wiggins, Maratha Mints and Coinage, Nashik,1989, p. 20 (Henceforth...'M.M.C.').

३. G. H. Khare, Gold Coinage of Shivaji The Great', Journal of the Numismatic Society of India, Vol. XIII, Part 1, Varanasi, 1951, p. 99.

नाण्यातील धातूच्या वजनाचे आणि नाण्यांचे मूल्य जवळपास असल्याने

VIVEKA ... HAPUR (Autonomous) JUNE 1964

Scanned with CamScanner

नाणे हा मूल्यवान धातुसंग्रह होता.

७. 'पुतळी' या संज्ञेने बऱ्याच संशोधकांना संभ्रमात टाकले आहे. मुळातील व्हेनेशिया येथून भारतात व्यापारी मार्गे आलेल्या 'डकेट' (Ducate) या सोन्याच्या नाण्याच्या छापाचे निर्हेतुक अंकन चालू राहिले. त्या आकृती असणाऱ्या सोन्याच्या नाण्यांना, वा नाण्यांच्या माळेला अनुक्रमे 'पुतळी', 'पुतळीची माळ' म्हणू लागले.

८. रघुनाथाध्वरी पंडित, राजव्यवहारकोश, मुंबई, १८६०, पृ. ४.

GT.Kulkarni, Banking in the 18th Century : A Case Study of a Poona Banker', ArthaVijnana, Vol. 15, Pune, June 1973, pp. 180-200. भारत १०. दि.मु. वाघ, 'मराठी सत्तेच्या उदयास्ताची भौगोलिक मीमांसा', इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष ६२, अंक- १-४, पुणे,

जुलै १९८३ - ऑक्टो. ८३, जाने ८४ - एप्रिल८४, पृ.११६.

११. शं.ना. जोशी, संभाजीकालीन पत्रसार संग्रह, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, १९४९, पृ.७५, ९८, १११, १२२, १२७, १५४, १६५, १७३, १७४, २००, २०१, २१७, २४२, २४३, २४५, २४७, २५७, २६४, २८४, २९३.

१२. M.M.C., p.21.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

१३. ग.भा. मेहेंदळे, श्री राजा शिवछत्रपति, खंड१, भाग २, पुस्तक पहिले, पुणे, १९९९, पृ. ३५८ - ३६१.

१४. Dr. Dilip Rajgor, A Standard Catalogue to the Sultanate Coins of India, Mumbai, 1995, pp. 5-15.

१५. पद्माकर प्रभुणे, 'आवटी अभ्यासः एक दुर्लक्षित नाणकशास्त्रीय पैलूं', भारतीय इतिहास आणि संस्कृति- त्रैमासिक, मुंबई, जुलै-सप्टेंबर, २००४, पृ. १६

१६. ग.ह.खरे, (संपा.) शिवचरित्र - वृत्त-संग्रह, ३ रा खंड : फार्सी विभाग, भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला क्र. ५३, पुणे, १९४१, पृ. ७०.,

१७. Shereen Moosvi, 'Money Supply and Silver Influx', in J.F. Richards (ed.), Monetary System of Mughal India, New Delhi, 1987, pp.17-19.

१८. Seema Alavi (ed.), The Eighteenth Century in India, New Delhi, 2002, pp. 3-13.

१९. श्री.म. (राजा) दीक्षित, '१९ व्या शतकातील महाराष्ट्रः मध्यम वर्गाचा उदय पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. (इतिहास) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, (अप्रकाशित), पुणे, मार्च १९९८, पृ. २५. १९.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

२०. Stewart Grodon, The Marathas 1600-1818, New Delhi, 1988, p.21.

२१. Ibid, pp.188-189.

२२. A. R. Kulkarni, Money and Banking under the Marathas (17th Century to 1848 A.D.), Paper presnted at Indian History Congress, Kolkata Session, (Unpublished Article), p.1.

२३. A.M. Deshpande, 19th Century Maharashtra : A Reassessment, Unpublished paper, p.1

२४. A.R. Kulkarni, Maharashtra in the Age of Shivaji, Pune, 2002, p.193.

२५. प्रा. राम बापट यांनी व्यक्तिगत चर्चेत हा मुद्दा मला संशोधनार्थ सांगितला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

२६. या विधानास अपवाद म्हणजे सदर कालखंडातील 'शिवराई' प्रकारची नाणी होत. या नाण्यांवर पुढील बाजूस 'श्री/राजा / शाऊ' व मागील बाजूस 'छत्र/पति' असा लेख येतो. अधिक संदर्भासाठी पहा. M.M.C., P.32.

२७. के.के. माहेश्वरी, केनेथ विगिन्स यांच्या ग्रंथाचे नावच मुळी 'Maratha Mints and Coinage'असे आहे. नाणकशास्त्राशी संबंधित सर्व नियतकालिकांत ही संज्ञा वापरली जाते.

२८. त्र्यं.शं. शेजवलकर, शेजवलकरांचे लेख, पुस्तक २ रें, मुंबई, १९५९, पृ. ८३.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

२९. डॉ. राजा दीक्षित यांनी मराठा विस्तारवाद (Maratha Expansionism) ही संज्ञा वापरली आहे. पहा: राजा दीक्षित, इतिहास, समाजविचार आणि केशवसुत, मुंबई, १९९३, पृ. २२,४१.

३०. डॉ. शैलेन्द्र भांडारे, 'पेशवाईतील नाणेपद्धती', संशोधक त्रैमासिक वर्ष ६४, अंक ४, डिसेंबर १९९६, धुळे, पृ. ६. (येथून पुढे या लेखाचा उल्लेख केवळ 'पे.ना.' असा केला आहे.)

३१. तत्रैव, पृ. ६-७.

३२. C.J.Abhang 'Proclamations: A Significant Instrument for Social Change in Colonial India', संशोधक-अमृतमहोत्सवी अंक, वर्ष अंक २, ३, आणि ४, धुळे, जून - डिसें. २००२, पृ.१२६. ७०.

३३. पहा : ग. ह. खरे, मंडळातील नाणी, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, चिन्हांचा तक्ता.

३४. आजही याच पद्धतीने धातुपरीक्षा केली जाते.

३५. J. Cluens, 'Maratha Coins in the Early Ninteenth Century', republished in Indian Numismatic Chronicle, Vol. IV, Pt.I, London. 1964-65, pp.26-37.

३६. संपा. शं. ना. जोशी, कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपति श्री शिवाजीराजे यांची बखर, पुणे, १९६०, पृ. ९६-९७

३७. M.M.C.,p.47.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

३८. अत्यंत दुर्मिळ नाणे, श्री. बस्तीमल सोळंकी खासगी संग्रह, पुणे.

३९. पहा : कोष्टक क्र . २ पुस्तकाचे पृ. ३२-३३.

४०. M.M.C., p.162.

४१. पद्माकर प्रभुणे, उपर्युक्त.

४२. 'M.M.C.', 'मंडळातील नाणी' यातील माहितीच्या आधारे मोजलेली संख्या.

४३. S.J. Manglam, 'Coins and Trade as reflected in Early Medieval Inscriptions', in Coinage, Trade and Economy, 3rd International Colloquium, Nashik, 1991, p.200.

४४. G.C. Wad and K.B. Marathe, Selections from The Satara Rajas and The Peshwas Diaries, Poona, 1911. (Henceforth 'S.S.R.P.D.')

४५. S.S.R.P.D., Vol. VIII, pp. 240-241.

४६. एकदा मक्ता दिला की कोणीही 'चढ' दिला तरीही रद्द होणार नाही. तत्रैव, पृ. २४१.

४७. वा.कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, नवी दिल्ली, १९७६, पृ.४०५.

४८. S.H. Hodiwala, Historical Studies in the Mughal Numismatics, Calcutta,1923.

४९. S.S.R.P.D., Vol. VII, pp. 288-289.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

५०. S.S.R.P.D., Vol. VII, p. 305.

५१. www.vijaynagar.comया संकेतस्थळावर सदर प्रक्रियेचे रेखाचित्र दिले आहे.

५२. भांडारे, पे.ना., पृ. २५.

५३. S.S.R.P.D., Vol. VII, p. 290.

५४. वा. कृ.भावे, उपर्युक्त,

५५. S.S.R.P.D., Vol. VII, pp.65-66.

५६. डॉ. म.रा. कुलकर्णी, पेशवाईतील न्यायदान, पुणे १९९८, पृ. ११५. (येथून पुढे या पुस्तकाचा उल्लेख केवळ पे.न्या.. असा केला आहे.)

५७. संशोधनासाठी निवडलेले कागद, क्र. १६/१७/१०३८१

५८. 'लारी' हे नाणे मुळात इराणमधील 'लार' प्रांतातील होते. चपटे, पिनेच्या आकाराचे हे नाणे विशेषतः कोकणातच व्यवहारात होते. आदीलशाहीचा इराणशी व्यापार असल्याने, कोकणातील 'लारी' या आदिलशाहने पाडल्या होत्या. त्यांवर झर्ब (टांकसाळ) दाबुली (दाभोळ) असे टांकसाळ नाम येते.

५९. M.I.A.S., p.129.

.६०. S.S.R.P.D., Vol. VII, pp. 157, 159.

६१. Ibid, p.247.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

६२. Idem, Vol.VIII,p.241-242.

६३. Ibid.

६४. S.S.R.P.D., Vol. VIII, pp. 137-138.

६५. Ibid, p.241.

६६. Ibid, pp.291-292.

६७. Ibid, Vol. VII., p.305.

६८. पे. न्या., पत्र १०२, पृ.११६.

६९. S.S.R.P.D., Vol. VIII. P.239.

७०. भांडारे, पे.ना... पृ. ९.

७१. तत्रैव

७२. V.D. Divekar, Survey of Material in Marathi on the Economic and Social History of India, Pune, 1981, p. 117.

७३. १. चं. बा. जोशी, 'दीक्षित पटवर्धन यांचे पेढीचा व्यवहार', भा.इ.सं.मं., त्रैमासिक, खंड १६, क्र. १, पुणे, १९३५, पृ.१५-२२

VIVEKANAND COLLE
EST
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

२. ना.गो. चापेकर, 'खासगीवाल्यांच्या हिशोबांचे मंथन', भा.इ.सं.मं. त्रैमासिक, खंड १, क्र २.

३, पुणे, ऑक्टो. १९२०, जाने. १९२१, पृ. ४९ - ७५.

७४. या परिच्छेदातील विवेचन पुढील संदर्भावरून केले आहे: चं. बा. जोशी, उपर्युक्त, पृ. १६.

७५. तत्रैव, पृ.१९, ना.गो. चापेकर, पेशवाईच्या सावलीत, पुणे, १९३७,

७६. तत्रैव, पृ. ३४.

७७.,पृ.33.

७८. तत्रैव, पृ.२६.

७९. इतिहाससंशोधक शं.ना. जोशी सत्कार समिती (संपा.), मराठेकालीन समाजदर्शन, पुणे, १९६०,

पृ.१६४.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE

Scanned with CamScanner

प्रकरण ५ वे

# थोडक्यात...

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या अनुक्रमे शिवकाल, पेशवेकाल व ब्रिटिश काळातील चलनाचा; तसेच तत्संबंधी अनेक पैलूंचा जो चिकित्सक विचार येथवर केला, त्यासंबंधीची निरीक्षणे आणि निष्कर्ष सारांशरूपाने प्रस्तुत प्रकरणात मांडलेले आहेत.

आधुनिक-पूर्व (Pre-modern) महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासाचा विचार करताना, मौद्रिक अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण घटक म्हणून चलनाचा (१७ ते १९व्या शतकातील 'प्रमुख चलनप्रकार' म्हणून नाण्यांचा) अभ्यास हा आवश्यक ठरतो. तसे पाहता महाराष्ट्राच्या चलनाच्याबाबत, अनेकांनी विविध अंगांनी कमी जास्त प्रमाणात आपले संशोधकीय योगदान देऊन सदर विषयाचा अभ्यास केला आहे. परंतु आधुनिक भारतीय चलनाची पार्श्वभूमी असणाऱ्या चलनाच्या समग्र इतिहासावर प्रकाश टाकणारे काम अद्यापि उपलब्ध नव्हते, असे नम्रपणे म्हणावे लागते. किंबहुना उपरिनिर्दिष्ट कालखंडातील अनेक कूटस्थळांबाबत अद्यापि अध्ययनास वाव आहे. पहिल्या, 'विषय प्रवेश' या प्रकरणात इतिहासाचे साधन म्हणून नाण्यांचे महत्व, आधुनिक-पूर्व महाराष्ट्रीय चलनाच्या विविध पैलूंच्या अध्ययनाची आवश्यकता या घटकांची चर्चा

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

केली आहे. अद्यापपावेतो वरील कालखंडातील चलनाचे अध्ययन एकतर हौशी नाणेसंग्राहकांच्या, गरजांच्या पातळीवर तरी झाले किंवा अध्ययनाचे दुसरे टोक म्हणजे ; प्रत्यक्ष चलनाचे अध्ययन न करता, केवळ ग्रांथिक वा पुराभिलेखीय

सामग्री (जी चलन वा तत्संबंधी आर्थिक क्रियांबाबत काही माहिती सांगते) प्रकाशित करणे, अशा पातळीवर झाले. याला अपवाद म्हणजे नव्याने प्रकाशित झालेले डॉ. शैलेन्द्र भांडारे यांचे बीजरूप संशोधन होय.' वास्तविक पाहता, अप्रकाशित पुराभिलेखीय सामग्री व प्रत्यक्ष नाण्यांचे अध्ययन यांच्या साहाय्याने, या 'आधुनिकपूर्व चलनाच्या, आधुनिक चलनात रूपांतराच्या' प्रक्रियेचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

'शिवकालीन चलन' ही वास्तविक पाहता एक व्यापक संकल्पना आहे. हे चलन अंतर्गत मूल्यावर आधारित चलन असल्याने मराठा राज्याच्या बाह्य प्रदेशातून आलेल्या चलनाचा अंतर्भावही सदर चलनात होत असे. तथापि 'विविध प्रांतांच्या चलनाची एक प्रकृती असते' हेही शिवकालीन चलनाच्या अध्ययनाने जाणवते. या संदर्भात छत्रपती शिवाजीमहाराजांनी सुरू केलेल्या शिवराई होन, तांब्याची शिवराई व नव्याने उपलब्ध चांदीच्या शिवराईचा' उल्लेख महत्वाचा ठरतो. यातील तांब्याची शिवराई, ही २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत, महाराष्ट्रीय चलनाची एक खासियत बनून राहिलेली स्पष्टपणे दिसते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

शिवकालीन चलनाची एकंदर परंपरा ही दाक्षिणात्य चलनपरंपरेकडे झुकणारी होती असा निष्कर्ष उपलब्ध नाणकप्रकार, त्यावरील मजकूर, नाण्यांचा पोत यांच्या अध्ययनाने निघतो. शिवछत्रपतींनी केलेला राज्यविस्तार हा पश्चिम व दक्षिण होता या तत्थ्याचे प्रत्यंतर १७ व्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी चलन देते. रुपया या मूलतः उत्तर भारतीय चलनाचा विशेष प्रसार किमान शिवकालीन महाराष्ट्रात तरी नव्हता. तर, विजयनगर साम्राज्यप्रणीत 'होन' या दाक्षिणात्य सुवर्ण नाण्यास शिवकालीन महाराष्ट्राच्या चलनात प्रमुख स्थान होते. शिवछत्रपतींचे चलन महाराष्ट्राची भाषिक अस्मिता प्रकट करते. शिवपूर्व महाराष्ट्रात यादव साम्राज्याच्या पतनानंतर (इ.स. १३१८) बहामनी, निजामशाही, आदिलशाही, फरूखी सुलतान या राजवटींपैकी सर्वांनी पूर्णतः पर्शियन अभिलेखयुक्त नाणी पाडली होती. त्या नाण्यांवर दोन्ही बाजूंना केवळ लेखच आढळतो. यासोबत शिवपूर्व महाराष्ट्रात विजयनगर साम्राज्याचे चलनही होते. 'देवदेवतांचे अंकन' व 'राजनाम' असे त्या चलनाचे स्वरूप असता, विजयनगरीय चलन व सुलतानी चलन यांच्यातील घटकांचा एक वेगळाच समन्वय शिवछत्रपतीप्रणित मराठी चलनात स्पष्टतः जाणवतो. सोन्याच्या नाण्याबाबत, विजयनगराच्या होन भागमूल्यांकांच्या चलन पद्धतीचा स्वीकार जरी छत्रपती शिवाजीमहाराजांनी केला असला तरी देवताअंकन/राजनाम अशा प्रकारची नाणी न पाडता, दोन्ही बाजूंवर केवळ राजनाम ('श्री/राजा/शिव'; दुसरीकडे 'छत्रपति') व्यक्त करणारी नाणी पाडलेली दिसून येतात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

"टांकसाळनाम व निर्मितिवर्षाचा अंक नसणे" हेही विजयनगरीय चलनाचा प्रभाव दर्शविते. कारण बहामनी निजामशाहीसारख्या सुलतानी चलनावर या दोनही गोष्टींचे सातत्यपूर्ण अंकन असते. शिवकालाच्या आर्थिक स्वरूपाचा विचार करता अर्थव्यवस्थेच्या मौद्रिकीकरणाची प्रक्रिया जाणवते. परंतु समकालीन साधने वस्तुविनिमयाचेही प्राबल्य दर्शवितात. असे असताना राज्याचे स्वातंत्र्य उद्घोषित करणारे एक स्वनामांकित चलन सुरु करण्याचा मान छत्रपति शिवरायांना द्यावा लागतो. नाण्याला दर्शनी मूल्य असतेच; पण शिवाजीमहाराजांच्या 'शिवराई'चे हे स्वातंत्र्यसूचक प्रतीकात्मक मूल्य ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत पाडलेली शिवराई नाणी व नंतरच्या कालखंडातील शिवराई नाणी यांच्यातील फरक हा त्यांच्या बाह्यस्वरूपावरून (मुख्यत: लेख) ओळखला गेला आहे. सुरुवातीच्या काळातील शिवराई कमी संख्येने उपलब्ध आहेत, परंतु उत्तरकालीन शिवराई फार मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. म्हणजेच सदर चलन त्याच्यातील गुणांमुळे आत्यंतिक प्रसिद्धी पावले होते. आधुनिक-पूर्व कालखंडात महसूल हा शासनाच्या उत्पन्नाच्या महत्त्वपूर्ण साधनांपैकी होता. महाराष्ट्रात खास करून महसूल रोखीची पद्धती मलिक अंबरने सुरू केली तरीही शिवकाळात दोन्ही पद्धतींनी म्हणजे रोख व वस्तुरूप असा महसूल गोळा होताना दिसतो. त्यातील जास्त भाग हा ऐनजिनसी म्हणजे वस्तुरूप होता, असे साधनांवरून स्पष्ट होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Auto
ESTD
JUNE
1964

Scanned with CamScanner

मराठा स्वातंत्र्ययुद्धानंतरच्या कालखंडात, १८ व्या शतकात चलनाच्या स्वरूपात परिवर्तन होताना दिसते. हे नावीन्य चांदीच्या चलनाच्या रूपाने अवतरते. शिवकालीन तसेच शिवपूर्वकालीनही महाराष्ट्रात चांदीच्या चलनास विशेष महत्त्व नव्हते. निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही, इमादशाही, बरीदशाही यांपैकी एकाही राजसत्तेचे एकही चांदीचे नाणे अद्यापि ज्ञात नाही." या तथ्यावरून रजत चलनास महत्त्व नव्हते हे सहज स्पष्ट होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, रजत चलनच नव्हते. मोगलांची चांदीची नाणी काही प्रमाणात चलनात आढळून येतात, पण १८ व्या शतकाप्रमाणे त्यांचे प्राबल्य दिसत नाही. १८ व्या शतकात, मराठी राज्यात वा 'मराठ्यांनी नव्याने जिंकलेल्या प्रदेशात मोगल राजनाम अंकित, परंतु महाराष्ट्रीय वा मराठ्यांच्या ताब्यातील ठिकाणांची टांकसाळ नामे, चिन्हे धारण करणारी अनेक प्रकारची व भागमूल्यांकांची चांदीची नाणी आढळतात. या चांदीच्या नाण्यांच्या बाह्य स्वरूपावरून मोगलांचे 'नाममात्र' वर्चस्व जाणवते. "पातशाही रक्षून जे करणे ते करावे" याचे प्रत्यंतर १८ व्या शतकातील मराठा चलन देते. या चलनावरील बादशाही राजनामांमुळेच त्र्यं.शं. शेजवलकरांसारखे इतिहासकार पेशव्यांचे स्वतंत्र चलन नव्हते या आशयाचे मत व्यक्त करतात. 'संयुक्त राजव्यवस्थेतील पेशव्यांच्या शिवाय इतर सरदारांचे चलन बादशाही राजनामाने अंकित असले तरी, काहींनी रूढ पद्धतीपेक्षा वेगळेच नाणकप्रकार पाडलेले दिसतात, उदा. सांगलीचे पटवर्धन यांच्या नाण्यावर 'श्री गणपती', 'पंतप्रधान' असा देवनागरी मजकूरही दिसतो, तर कुलाबकर आंग्रे यांच्या नाण्यावर फक्त 'श्री' हे अक्षर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

विविध दिसते. एकंदरीत १८ व्या शतकातील मराठा चलनात विविध प्रकारचे (types),
टांकसाळीतून उत्पादित रुपये व त्यांचे भागमूल्यांक प्रचलित दिसतात. हा सर्व बदल जो दिसतो
त्यामागे एक कारण- परंपरा दिसते. राजकीय विस्तारवाद, लष्कराच्या संख्येतील वाढ, तर
वित्तपुरवठ्याची गरज, रोखीप्रधान अर्थव्यवस्थेकडे वाटचाल, वाढता पेढीव्यवहार, ही त्यामागील
कारणे होत. ब्रिटिश चलनपद्धतीत आधुनिक चलनपद्धतीतील अनेक गोष्टी बीजरूपाने
आढळतात, परंतु १७-१८ व्या शतकातील मराठा चलनातही काही लक्षणीय बाबी, काही प्रसुप्त
प्रेरणा दिसतात. बदलाबरोबरच सातत्याचा हा धागा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. सरकारनियंत्रित •
केन्द्रीय टांकसाळी, नाणकसंबंधित गुन्हेगारीबाबत कठोर शासन, • टांकसाळ गैरव्यवहारांबाबत
चौकशी समिती, या गोष्टी चलनविषयक जागरूकता दाखवतात. इ.स. १८३५ साली ब्रिटिशांनी
एकच्छत्री चलन (Uniform Currency) भारतात लागू केले. ज्याप्रमाणे प्रशासकीय एकीकरण
घडवून आणले, तद्वत संपूर्ण ब्रिटिश भारतासाठी एकच चलन अस्तित्वात आले. हा चलनातील
आधुनिकतेचा मापदंड मानला जातो. परंतु १८ व्या शतकातही अशा स्वरूपाचा प्रयत्न केला गेला
होता. पेशव्यांनी कोकणातील टांकसाळींच्या केन्द्रीकरणाचा अभूतपूर्व असा प्रयत्न केला होता.
त्यांनी कोकणातील राज्यातील इतर टांकसाळी बंद करून, विशिष्ट प्रकारचीच नाणी, ठराविक
मुदतीसाठी, सरकारी तालुक्यात टांकसाळी घालून, पाडण्याचा प्रयत्न केला. या प्रयोगास पूरक
मदत म्हणून मक्तेदारांस असे कळवण्यात आले की, त्यांच्याहून अधिक बोली लावण्यासही सदर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

काम दिले जाणार नाही, तात्पर्य, एकाच मक्तेदाराने ठराविक काळासाठी सरकारसाठी, सरकारी तालुक्यात एकहाती नाणकोत्पादन करावे. यात टांकसाळींचे केन्द्रीकरण व चलनाचे प्रमाणीकरण साधण्याचा प्रयत्न केला होता. ' चलनाबाबत काही आदेश महत्त्वपूर्ण होत. उदा. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील एका सनदेत नाणी पाडण्याच्या आवटीतील (Die) वर्षाचा आकडा दरवर्षी बदलावा, अशी अट दिसते. यावरून चलनाबाबत सरकारची जागरूकता व कालभान जाणवते. १८ व्या शतकातील चलनासमोर उभे ठाकलेले प्रश्न शासकीय आणि व्यवस्थात्मक अशा दोनही पातळींवर सोडवण्याचे प्रयत्न दिसतात. शासकीय पातळीवर शासकीय सनदांतील अटींच्याद्वारे, नियमांच्याद्वारे खाजगी नाणे उत्पादकास मक्ता दिला जाई. सरकारी अटी व नियमात कसूर करण्यास दंड, शिक्षा केली जाई; परंतु व्यवस्थात्मक पातळी ही 'शासकीय पातळी' पेक्षा जास्त महत्त्वाची होय. यामध्ये सराफ-सावकार यांच्या तपासणीपद्धती व चिन्हांकन यांचा, तसेच पेढी व्यवहारांचा समावेश होतो. प्रत्यक्ष चलनव्यवहार करणाऱ्या या लोकांच्या हाती तत्कालीन चलनाचे बहुतांश नियंत्रण होते. नाण्याचे उत्पादन, नाण्यांच्या विविध प्रकारांतील अदलाबदल, नाणे-पारखणी व तपासणी इत्यादी कामांबाबत सराफ सावकारांना नफा मिळत असे. मात्र यामुळे 'विविध कसाचे रुपये' ही १९ व्या शतकात नव्याने सत्ताधीश बनलेल्या ब्रिटिशांच्या चलनविषयक धोरणात अडथळा आणणारी बाब ठरली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

मक्ता पद्धतीने मिळणारे खासगी नाणकोत्पादन अधिकार, नाणी पाडण्यासाठी मानवी शक्तीचा वापर (हस्तोत्पादित नाणी), विविध टांकसाळींचे रुपये, रुपया जरी असला तरी कसाप्रमाणे मूल्य वैविध्य, शुद्धतानिर्देशक चिन्हांची नाण्यांवर योजना, विनिमय दर (बट्टा) ही १८ व्या शतकातील मराठी चलनपद्धतीची वैशिष्टये होत. सदर वैशिष्टये आधुनिक दृष्टिकोनातून चलनाच्या दृष्टीने अडचणी उत्पन्न करणारी असली तरी ती त्या काळची 'चलनव्यवस्था' होती आणि त्यास आपण 'आधुनिक- पूर्व' चलन संबोधू शकतो. मध्ययुगीन पद्धतीची असली तरी या चलनात प्रसुप्त प्रेरणा जाणवतात. त्यामुळे तिला 'स्थित्यंतराची अवस्था' म्हणता येईल.

## ब्रिटिशकालीन चलन :

अष्टीच्या लढाईने मराठी राज्य संपले आणि पेशव्यांचे प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात आले. या नवीन विजयाबरोबर अनेक नवीन समस्या ब्रिटिशांसमोर उभ्या राहिल्या. महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल प्रस्थापित करून त्यास मजबुती आणण्याची कामगिरी करणाऱ्या एल्फिन्स्टनबद्दल डॉ. राजा दीक्षित लिहितात, "एतद्देशीय व युरोपीय पद्धतींचा मेळ घालून विकसित केलेल्या प्रशासनपद्धतीला सुविहित कायद्याच्या रेखीव चौकटीत बद्ध करताना त्याने परंपरावादाचा उपयुक्ततावादाशी समन्वय साधला. त्याची ही तात्त्विक बैठक समजावून घेतली तर त्याच्या 'नवे काही 'नको' या मंत्रातच नवतेचे झरे कसे दडलेले होते, याचे रहस्य उलगडू शकत.'

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner

या कालखंडातील चलनाचे व तत्संबंधी कागदपत्रांचे अध्ययन वरील विधानास बळकटी आणते. एल्फिन्स्टनने पेशव्यांचे प्रदेश जिंकताक्षणी ब्रिटिश चलन अजिबात लागू केले नाही. उलट आपल्या सहकारी कलेक्टर्सना विविध प्रकारची माहिती गोळा करण्यास प्रवृत्त केले. जमा झालेल्या माहितीच्या आधारे चलन विषयक प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडवले. १८३० पर्यंत ब्रिटिशांनी जुन्या चलनावर विशेष करून आक्षेप घेतलेला दिसत नाही. मात्र हे करताना खोट्या अथवा हिणकस नाण्यांबाबत कठोर भूमिका घेतलेली दिसते. सराफ-सावकारांकडून नाण्यांचे विनिमयात्मक बाजारभाव जमा करून पेशव्यांच्या काळातील पुणे-चिंचवड येथे पाडल्या जाणाऱ्या विशेष लोकप्रिय अशा 'अंकुशी रुपया' या चांदीच्या नाण्यास प्रमाण नाणे मानले. हे करताना ब्रिटिशांनीही अंकुशी प्रकारची नाणी उत्पादित केली होती, हेही लक्षात घेतले पाहिजे. कंपनीच्या रुपयाची पारख करून त्यावर छाप मारणे तसेच कंपनीच्या रुपयास बट्टा घेणे या गोष्टींवर बंदी आणली व त्याबाबत 'गुन्हेगारी' हा दंड घेण्याचा बडगाही दाखवलेला दिसतो. नाण्यांवर छाप मारणे, विविध प्रकारांची पारखणी करणे, या गोष्टींशिवाय नाणी ही सुलभपणे प्रचलनात रहावीत अशी चलनविषयक अपेक्षा व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा चलनास उत्तम चलन म्हणून अग्रक्रम देताना दिसतात. अर्थात या पद्धतीच्या चलनाचा आग्रह ही आधुनिक संकल्पना आहे. ब्रिटिशपूर्व काळात अशी अपेक्षा कोणत्याही मध्ययुगीन, तसेच प्राचीन काळातील राज्यकर्त्याने व्यक्त केलेली दिसत नाही. हा सर्व चलनविषयक विचार चालू असताना एल्फिन्स्टनचा सहकारी पॉटिंजर स्पष्टपणे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

नोंदवतो की, चलन इ. विषयांच्या नाजूकपणाची, महत्वाची त्यास कल्पना होती, या विषयात हस्तक्षेप करण्याची त्याची इच्छा नव्हती; परंतु सावकार मंडळींच्या गैरव्यवहारांमुळे लोकांना जो तोटा होतो, त्या कारणासाठी या प्रकरणात त्याला लक्ष घालावे लागले. या उल्लेखावरून एतद्देशीय गोष्टीत विशेष दखलअंदाजी न करण्याचे एल्फिन्स्टनचे धोरण प्रतिध्वनित होते. तरीही लोकांना होणाऱ्या तोट्यामुळे (म्हणजेच लोककल्याणार्थ) आपण चलनाबाबत सावकारांच्या व्यवहारात लक्ष घालत असल्याचे पॉटिंजरचे विधान महत्त्वाचे आहे. या प्रकारात जरी ब्रिटिशांनी 'लोकांना तोटा होऊ नये' असे म्हटले असले तरी सुरुवातीच्या काळात खुद्द कंपनीलाच देशी सावकारांच्यामुळे फसवणूक होऊन तोटा सहन करावा लागला होता.

एल्फिन्स्टननंतर सत्तेवर आलेल्या चॅपलिनने चलनाबाबत काही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. चलनाबाबत एकसूत्रता आणण्याचा महत्त्वपूर्ण विचार त्याच्या काळातील पत्रव्यवहारात आढळतो.

१८३० सालापासून ब्रिटिशांच्या चलनात व तद्विषयक धोरणात आक्रमकता येताना दिसते. तांब्याच्या ब्रिटिश नाण्यांचा खास आग्रह दिसू लागतो आणि त्यापुढील काळात देशी चलन विविध मार्गांनी प्रचलनातून काढण्याचे प्रयत्न दिसतात. (उदा. देशी चलन विकत घेणे, बदलून देणे इ.) १८३५ पर्यंत ब्रिटिशशासित भारताच्या तीनही इलाख्यांतील नाणक व्यवस्था स्वतंत्र दिसते, १८३५ सालापासून एकच्छत्री चलन (Uniform Currency) भारतात लागू झाले. त्यावेळी, सोन्याची

VIVEKANAND COLLEGE KOLHAP... ESTD JUNE 1964 (Aut...

Scanned with CamScanner

नाणी बंद करून चांदीचा रुपया हे ब्रिटिश भारताचे एकच्छत्री नाणे मानले गेले. भारतीय चलनाच्या इतिहासातील तसेच भारताच्या इतिहासातीलही महत्त्वपूर्ण घटना म्हणजे हा १८३५ चा एकछत्री चलनाचा कायदा होय. १८३५ च्या नाणकविषयक कायद्याने भारतीय नाणक इतिहासात प्रथमच आधुनिकतेच्या दिशेने उत्क्रांत होणारे राष्ट्रीय चलन लाभले.

भारतातील ब्रिटिश चलनाचा जर आढावा घेतला तर त्यातील उत्क्रांती सहज लक्षात येते. एकछत्री चलनाचा कायदा जरी १८३५ साली झाला असला तरी, ज्याप्रमाणे त्याच्या संकल्पनेची उत्क्रांती १८०६ सालापासून दिसते, तसे तांब्याच्या ब्रिटिश नाण्यांचा इतिहास जरी अगदी १६६५ पर्यंत मागे जात असला तरी १८३५ साली अस्तित्वात आलेल्या तांब्याच्या नाण्यांची (त्या प्रकारची) सुरुवात १७९१ पासून झाली होती.

केवळ जाहीरनामे व कायदा याने चलनाबाबत एकच्छत्रता (Uniformity) येणार नाही, हे ब्रिटिशांना माहिती होते. त्यामुळे तांब्याची नवीन नाणी चलनात आणण्याचे त्यांनी पद्धतशीर प्रयोग केले. सदर पुस्तकाच्या परिशिष्टातील अप्रकाशित कागदपत्रांच्या अध्ययनाने खानदेशात सदर प्रयोग कशा प्रकारे राबविला ते समजते आणि सदर प्रयोग राबविणारी यंत्रणाही समजते.

ब्रिटिशांची चलनविषयक धोरणे फक्त त्यांच्यापुरतीच आणि अत्यंत गोपनीय होती, असे वाटत नाही. कारण पुण्याची रहिवासी असणारी एक दादोबा हरचंदजी प्रभू नामक व्यक्ती, थेट गव्हर्नर इन कॉन्सिल यांचेकडे नवीन ब्रिटिश नाणी चलनात आणण्याची व जुनी नाणी चलनाबाहेर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

काढण्याची एक अभिनव योजना मांडताना दिसते. १८३६ साली सेवानिवृत्त असणाऱ्या या पुणेकर व्यक्तीचे चलनविषयक आकलन विलक्षण आहे. ही योजना महत्त्वपूर्ण असण्याची 'शक्यता' वर्तवूनही पुण्याचा कलेक्टर, दादोबा हरचंदजीची मागणी, 'बाहेरच्या राज्यातून ब्रिटिशेतर चलन 'येत राहील', या सबबीवर नामंजूर करण्याबाबत मुंबईस पत्रव्यवहार करतो. तरीही दादोबा हरचंदजीचीच योजना ब्रिटिश खानदेशात व अहमदनगर परिसरात वापरताना दिसतात; पण त्यात देशी वा गैरशासकीय व्यक्तीस कोणतेही स्थान नाही. कलेक्टर्सच्या मार्फत जुनी नाणी खरेदी करून, नवीन ब्रिटिश नाणी चलनात आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

सदर प्रयोगास संमिश्र यश मिळाल्याचे कागदपत्रांवरून समजते.

चलनाबाबतच्या या सर्व सुधारणा जर बारकाईने अभ्यासल्या तर किमान १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात चलनाबाबत उत्क्रांतीची एक प्रक्रिया दिसते असे विधान करता येईल. कारण देशी तांब्याच्या चलनाने, विशेषतः शिवराई नाण्यांनी नवीन ब्रिटिश चलनासमोर आव्हान उभारले होते. हा संघर्ष १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत चाललेला दिसतो.

साधारणतः १८४० पासून ते १९४७ पर्यंतच्या नाणकविषयक घडामोडी पाहता त्यांच्यात मूलभूत फरक दिसत नाही. नाण्यांची परिमाणे, धातू, नक्षी, यात जरी बरेचसे 'संग्राहकांच्या दृष्टीने महत्त्वाचे बदल असले तरी विशेष बदल नाही. या कालखंडातील चलनाला आपण सध्या वापर असणाऱ्या चलनाचे पूर्वसूरी म्हणता येईल.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

ब्रिटिशांनी महाराष्ट्रीय चलनात ज्या सुधारणा केल्या त्या केवळ पूर्वीच्या पद्धतीतील दोष दूर करण्याकरता नव्हत्या तर प्रशासनाच्या इतर विभागांच्या सूसूत्रीकरणासोबत आधुनिक पद्धतीची, यंत्रोत्पादित नाण्यांची चलनयंत्रणा राबवून याही बाबतीत सुसूत्रीकरण केलेले दिसते. ब्रिटिशांचे चलनविषयक बदल हे केवळ प्रशासकीय गरजेतून उद्भवले नव्हते. ब्रिटिश साम्राज्यवादाचे आर्थिक स्वरूप लक्षात घेता हे बदल अपरिहार्य होते. किंबहुना चलनसुधारणा हेसुद्धा ब्रिटिशांचे धुरीणत्व (Hegemony) प्रस्थापित करण्याचे एक साधन होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यातील सर्वच तपशिलात्मक घटक अभ्यासणे मनोरंजक असले तरी त्यांचा प्रातिनिधिक अभ्यास करून १७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या चलनाचा चिकित्सक अभ्यास मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला आहे.

## संदर्भ आणि टिपा

१) डॉ. शैलेन्द्रभांडारे, पेशवाईतीलनाणेपद्धती, संशोधक, वर्ष६४, अंक४, डिसेंबर१९९६, धुळे, पृ. ३-२६. २) शिवकालीनचलनात, शिवकालीनमहाराष्ट्रातप्रचलितसर्वप्रकारच्याचलनांचासमावेशहोतो. उदा. मोगल, आदिलशाही, निजामशाही, ब्रिटिशइत्यादीश्री. ग. भा. मेहेंदळे यांनी आपल्या ग्रंथात यांचा परामर्श घेतला

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

आहे. पहा: गजानन मेहेंदळे, श्री राजा शिवछत्रपती - खंड १, भाग २, पुस्तक पहिले, पुणे, १९९९, पृ. ३३३-३६९.

२) अद्यापपावेतो'श्री/जगदंबा /प्रसन्न'अशाआशयाच्यालेखाचे१रुपयापरिमाणाचेचांदीचेनाणेउपलब्धहोते. मात्रसदरनाणेशिवरायांचेचांदीचेनाणेम्हणूनमानतायेईलअथवानाहीयाबाबतविद्वानातमतभेदआहेत. मुंबईयेथेशासनाचीमान्यताघेऊनजुन्यानाण्यांचाएकलिलाव (auction) आयोजित करण्यात आला. दि.१९ एप्रिल २००३, (क्र. ५) या लिलावात एक चांदीचे नाणे मांडण्यात आले. त्याच्या एका बाजू 'श्री/राजा/शिव' तर दुसरीकडे 'छत्रपति' असा लेख असून त्याचे वजन ३ ग्रॅम्स आहे. अधिक तपशीलासाठी इंटरनेटवरील पुढील संकेतस्थळ पहा: 5th auction- www.todyauction.com

३) याचाउल्लेख१९व्याशतकाच्यापूर्वार्धातीलब्रिटिशपत्रांमध्येआलाआहे. उदा. सदरपुस्तकांतीलपरिशिष्टक्र. ३मधीलब्रिटिशपत्रातीलउल्लेखपाहा. पत्रक्र. ८पृ. ३०४ओळ: २४, २५.

४) सदरराजवटींच्याउपलब्धनाण्यांविषयीअनेकग्रंथउपलब्ध आहेत. परंतु सदर राजवटींच्या नाण्यांच्या अद्ययावत सचित्र नोंदीचा अभ्यास करता चांदीचे नाणे पाडल्याचे अद्यापि

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

ज्ञात नाही. पहा: Dr. DilipRajgor, A Standard Catalogue of the Sultanate Coins of India, Mumbai, 1995.

५) त्र्यं.शं शेजवलकर, शेजवलकरांचे लेख, पुस्तक २ रे, मुंबई, १९५९, पृ. ८३.मराठ्यांच्या लष्करी हालचाली व उपलब्ध कागदपत्र, • बखरींवरून त्यांची विस्तारवादी भूमिका स्पष्ट होते. उदा. अटक जिंकल्यानंतर 'रूमशाम

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

# शिवराई



राजा शिव छत्र पती


सदरच्या शिवराई या नाण्यावर एका बाजूस छेत्र पति व दुसऱ्या बाजूस राजा शिव असे नागरी लिपिमध्ये अंकन केले आहे.

धातू : तांबे , वजन : 8 ग्रॅम

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# अर्धी शिवराई



सोबतचे नाणे हे अर्धी शिवराई आहे. एका बाजूस छ (त्र) पति व दुसऱ्या बाजूस (श्री) राजा असे अंकन केले आहे. सर्वसाधारण शिवराई नाण्याच्या अर्धे या नाण्याचे वजन आहे. त्यामुळे हे नाणे अर्धी शिवराई पैसा म्हणून गणले जाते

धातू : तांबे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

# दुदाडी शिवराई



छत्रपती शाहू महाराजांच्या काळामध्ये शिवराई नाण्यावर आडव्या दांडीचे अंकन करण्यास सुरवात झाली. त्यामुळे अशी नाणी दुदांडी शिवराई म्हणून ओळखली जाऊ लागली. सदरच्या नाण्याच्या एका बाजूस छत्रपति व दुसऱ्या बाजूस श्री राजा असे अंकन केले आहे.

वजन: 9.1 ग्रॅम

धातू : तांबे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

# शिवराई (डेटेड)




छत्रपती शिवाजी महाराजांनी 17 व्या शतकात स्वराज्याची निर्मिती केली. राज्याभिषेकावेळी तांब्याची शिवराई व सोन्याचे होन ही नाणी पाडण्यास सुरवात केली. या नाण्यावर देवनागरी लिपीमध्ये एका बाजूस 'छत्रपती' व दुसऱ्या बाजूस 'श्री राजा शिव' असे अंकन केले. छत्रपती शिवाजी

कालखंड : इ.स. 1823 (इस्ट इंडिया कंपनी)

धातू : तांबे

वजन : 9.6 ग्रॅम

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

शिवप्रसाद शेवाळे यांच्याकडून शिवकालीन नाण्यांची माहिती संकलन करताना





VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with CamScanner